बॉम्बे चष्माघर
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
फोन : 235222, मो.9021853108

आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ७० ■ अंक क्र.५० ■ सोमवार २३ नोव्हेंबर २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.NO./DHL/53/24-26

।। श्री गणेशाय नमः ।।
कुणाल वधवा
9765595037
9405171771
श्रीराम बोरवेल्स
जमीन, घर, शेती यावर
४.७५, ५ व ६ इंची बोर करुन मिळेल.
तसेच सबमर्सिबल पंप बसवून मिळेल.
१४, राधाकृष्णन शॉपींग सेंटर, झाशी राणी चौक, मनपाजवळ, धुळे

राजस्थानातील कोट्याजवळ धुळ्याची क्रुझर गाडी ट्रकला धडकली झोप लागल्याने अपघात, पंतप्रधानांची मृतांना दोन लाखांची मदत

धुळे दि.२२: राजस्थानमधील कोटा येथे शंभूपुरा गावाजवळ प्रवाशांना घेऊन जाणाऱ्या क्रुझर मध्यरात्री बाराच्या सुमारास भीषण अपघात झाला. या अपघातात धुळे जिल्ह्यातील एकाच परिवारातील नऊ जण ठार झाले असून, सहा जण जखमी झाले. क्रुझरचा चालकाला डुलकी आल्याने अपघात झाल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. मृतांमध्ये धुळे शहरातील सुरत वळण महामार्ग लगत असलेल्या शांतुषा नगर, नवनाथ नगर तसेच शिंदखेडा



तालुक्यातील अमराळे येथील रहिवाशांचा समावेश आहे. अपघातग्रस्त वाहनात एकूण व्यक्ती प्रवास करीत होते.

गेल्या चार दिवसांपूर्वी दर्शनासाठी गेलेले पवार कुटुंबीय खाटू श्याम येथे दर्शन करून परतत असताना अपघात झाला. एकाच परिवारातील कुटुंबीयांचा अपघाती मृत्यू झाल्याने धुळे जिल्ह्यासह राज्यभरात हळहळ व्यक्त होत आहे. पतंप्रधान मोदी यांनी मृतांना दोन लाख तर जखमींना पन्नास हजाराची मदत जाहिर केली आहे.

एकाच कुटुंबीयातील चौघांसह पवार कुटुंबातील नऊ जणांचा त्यात मृत्यू झाला. जखमींना कोटा येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. अपघाताची माहिती मिळताच धुळ्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी थेट कोटा येथील वैद्यकीय यंत्रणा, शासकीय यंत्रणेशी संपर्क साधला, उपचार आणि पुढील कार्यवाहीसाठी योग्य त्या सूचनाही दिल्या.

धुळे शहरातील सुरत वळण



महामार्ग लगतचे रहिवासी

चंद्रदीप हॉटेल समोर शांतुषा नगरमध्ये सजन पवार यांचे वास्तव्य आहे. त्यांचे कुटुंबीय, भाऊ दौलत पवार आणि त्यांचे कुटुंबीय, भाऊबंदीतील व नवनाथ नगर येथे वास्तव्यास असलेले शरद पवार आपल्या कुटुंबीयांसह चार दिवसांपूर्वी क्रुझर (एम एच१८/सीएल३००५) देवदर्शनासाठी निघाले. विविध धार्मिक ठिकाणी त्यांनी भेटी दिल्या. श्री खाटू श्याम येथील मंदिरात दर्शन घेतल्यानंतर ते परतीच्या प्रवासाला धुळ्याकडे येण्यास निघाले. मात्र रस्त्यातच त्यांच्यावर काळाने घाला घातला. राजस्थानातील कोटा- उदयपूर मार्गावरील शंभू पुरा गावाजवळ देवनारायण ढाबा आहे. त्या ढाब्यापासून जवळच महामार्गालगत उभ्या असलेल्या ट्रकवर त्यांची ट्रॅव्हलर आदळली. त्यात ट्रॅव्हलरचा चक्काचूर होऊन पवार **(पान ४ वर)**

अमराळे येथेच होणार सर्व मृतांवर अंत्यसंस्कार

धुळे दि.२२: कोटा (राजस्थान) शंभूपुरा येथे झालेल्या अपघातात पवार कुटुंबातील नऊ जणांचा जागीच मृत्यू झाला. सर्वांचे मृतदेह रात्री उशिरा त्यांच्या मूळ गावी अमराळे (ता. शिंदखेडा) येथे आणण्याची शक्यता आहे. त्याच ठिकाणी सर्वांचे अंत्यसंस्कार करण्यात येतील.

पवार कुटुंबीयातील चार जण धुळे शहरातील सुरत वळण महामार्गालगत असलेल्या शांतुषा नगरमध्ये वास्तव्यास आहेत. अन्य दोघे धुळे नवनाथ नगर मध्ये तर अन्य तीन जण अमराळे येथील रहिवासी आहेत. पवार कुटुंबीय मूळचे **(पान ४ वर)**

महापौर मायादेवी परदेशींनी झोपेच्या गोळ्या घेतल्या प्रकृती स्थिर, आमदारांच्या नेतृत्वाखाली निषेध मोर्चा



धुळे, दि. २२ (प्रतिनिधी) : धुळ्याच्या महापौर मायादेवी परदेशी यांच्याविषयी सोशल मीडियावर संजय शर्मा यांच्याकडून चारित्र्यहनणाचा प्रयत्न झाल्यानंतर श्रीमती परदेशी यांनी शनिवारी सायंकाळी निवासस्थानी झोपेच्या प्रमाणाबाहेर गोळ्या घेतल्या. त्यांना तातडीने रात्रीच नकाणेरोडवरील खासगी रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे. डॉक्टर यतीन वाघ यांनी त्यांना अठ्ठेचाळीस तास देखरेखी खाली ठेवले आहे. त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती आमदार अनुप अग्रवाल यांनी दिली. दरम्यान, शर्मा यावर पोलिसांनी सक्त कारवाई करावी आणि कोर्टाने दया दाखवू नये, असे मत आमदार अनुप अग्रवाल यांनी व्यक्त केले. आमदार अग्रवाल यांच्या नेतृत्वात रविवारी सकाळी काळ्या फिती लावून पोलिस मुख्यालयावर मोर्चा काढत पोलिस अधीक्षकांना निवेदन देण्यात आले. महिलांचा अपमान करणाऱ्यांवर सक्त कारवाई करावी, अशी मागणी यावेळी निवेदनातून करण्यात आली.

धुळे शहरातील कथित अवैध व्यवसाय आणि कथित विकास कामे हे मुद्दे सोशल मिडीयावर हाताळून तीन आठवड्यांपासून आरोप-प्रत्यारोप होत आहेत. शहरातील साक्रीरोडवरील नल्यावर उभारण्यात येत असलेला पुल कोसळल्यानंतर सामाजिक कार्यकर्ते संजय शर्मा यांनी सोशल मिडीयावर थेट टक्केवारीचा उल्लेख करीत आमदार, महापौर आणि शासकीय यंत्रणेतील अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार केला, असा दावा केला. त्यानंतर आरोप प्रत्यारोप होऊ लागले. दिवाळीच्या काळात संजय शर्मा यांनी महापौर आणि त्यांच्या पतीबाबत जातीवाचक उल्लेख करीत **(पान ४ वर)**

अनुदानित युरियाचा काळ्या बाजारात विक्रीचा प्रयत्न कृषी विभागाने पोलीसांच्या मदतीने कंटेनर पकडला



सोनगीर दि. २२ (प्रतिनिधी): शेतकऱ्यांच्या हक्काचा अनुदानित रासायनिक खत (युरिया) साठा चोर बाजारात विकण्याच्या इराद्याने अवैधपणे वाहून नेणारा कंटेनर कृषी विभागाच्या सतर्कतेमुळे आणि सोनगीर पोलिसांच्या मदतीने धुळे तालुक्यातील लामकानी चौफुलीवर पकडण्यात आला. या कारवाईत कंटेनरसह सुमारे १८ लाख ६७ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, ४ संशयितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून याप्रकरणी चालकास अटक करण्यात आली आहे त्यास न्यायालयाने ३ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणाचे धागेदोरे शहादा-नंदुरबारपासून पुढे कोठे पोहोचतात आणि या रॅकेटचा सूत्रधार कोण, याबाबत विविध चर्चांना उधाण आले आहे.

सोनगीर पोलीस ठाण्यात दाखल फिर्यादीनुसार, दि. १९ नोव्हेंबर २०२६ रोजी पंचायत समिती शहादा **(पान २ वर)**

रामराव वडकुते यांचे निधन राष्ट्रपती, मोदींकडून शोक



नवी दिल्ली, दि. २२ : भाजपचे राज्यसभा खासदार रामराव वडकुते यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात मोठी हानी झाली आहे. त्यांच्या निधनाबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यासह विविध राजकीय नेत्यांनी दुःख व्यक्त करत श्रद्धांजली अर्पण केली. समाजसेवेतील योगदान, जनकल्याणाची बांधिलकी आणि धनगर समाजाच्या प्रश्नांसाठी त्यांनी केलेले कार्य नेत्यांनी अधोरेखित केले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी **(पान ४ वर)**

दुष्काळाची स्थिती लक्षात घेता मेंढ्यांच्या स्थलांतराला वेग

नंदुरबार, दि. २२ (प्रतिनिधी): दुष्काळाची दाहकता दिवसेंदिवस वाढत असून आता माणसांसोबत मुक्या जनावरांवरही स्थलांतराची वेळ आली आहे. चारा आणि पाण्यासाठी पशुपालकांना आपल्या मेंढ्यांसह ५० किलोमीटरहून अधिक अंतराची भटक्ंती करावी लागत आहे.

धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातून पशुपालक सुमारे ९००मेंढ्या घेऊन नंदुरबार जिल्ह्याकडे रवाना झाले आहेत. साक्री परिसरात चारा आणि पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाल्याने पशुपालकांसमोर आपल्या जनावरांना जगवण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. मेंढ्यांना **(पान ४ वर)**

शर्माच्या घराची तोडफोड, विनयभंगाचा महापौर पुत्रासह चाळीस जणांवर गुन्हा

धुळे, दि. २२ : सोशल मीडियावर पोस्ट प्रसारीत केल्याच्या प्रकारानंतर एका पाठोपाठ एक वाद सुरूच आहेत. पाच कंदील चौकातील सुप्रभा संजय शर्मा या महिलेच्या घरात घुसून महापौरांचा पुत्र विक्की परदेशीसह ३० ते ४० जणांनी संसार उपयोगी साहित्याची तोडफोड केली. महिलेस लज्जा वाटेल असे कृत्य करून विनयभंग केला, याप्रकरणी आझाद नगर पोलीस ठाण्यात शनिवारी रात्री उशिरा गुन्हा दाखल झाला.

शहरातील पाच कंदील चौकात वास्तव्यास असलेल्या सुप्रभा संजय शर्मा या महिलेने फिर्याद दिली. त्यानुसार त्यांच्या पतीने सोशल मीडियावर पोस्ट प्रसारीत केली होती. त्या कारणावरून संशयित विक्की महादेव परदेशी, नगरसेवक रोहित चांदवडे, राकेश कुलेवार, जयेश वावडे, किरण अहिरे, रोहित विभांडीक, अक्षय चौधरी, सागर वाडेकर, आकाश, राहुल (पुर्ण नाव समजू शकले नाही) यांच्यासह अन्य ३० ते ४० जणांनी वीस नोव्हेंबरला सायंकाळी सात नंतर संबंधित महिला घरी एकटी असताना घराचे शटर उघडून **(पान ४ वर)**

रानमळा येथील महिलेची गळफास घेऊन आत्महत्या

धुळे, दि. २२ : रानमळा (ता. धुळे) येथील महिलेने गळफास घेऊन आत्महत्या केली. रुपाली गजेंद्र गोसावी (वय २७) असे तिचे नाव आहे. शनिवारी दुपारी घराच्या दुसऱ्या मजल्यावरील एका खोलीत स्लॅबला तिने गळफास घेतला. पावणेचारच्या सुमारास दरवाजा बंद असल्याचे कुटुंबीयांच्या निदर्शनास आले. कुटुंबीयांनी दरवाजा कसाबसा उघडून रूपालीला खाली उतरवले. तिला सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. याप्रकरणी कुटुंबीय दिलेल्या माहितीनुसार मोहाडी पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद झाली. हवालदार किरण कोठावदे तपास करीत आहेत.

विखरणला वैरण बियाण्यांचे वाटप दुग्ध व्यवसाय जोपासा पणन मंत्री रावल



धुळे, दि. २२ (प्रतिनिधी) : दुष्काळी परिस्थितीत पशुधनासाठी हिरव्या चाऱ्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी वैरण विकास योजना महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या योजनेच्या माध्यमातून स्थानिक पातळीवर चारा उत्पादन वाढवून पशुपालकांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला जात आहे. पशुपालकांनी उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करून वैरण पिकांची लागवड करावी आणि दुग्ध व्यवसायाच्या माध्यमातून आर्थिक उत्पन्न वाढवावे, असे आवाहन राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले.

शिंदखेडा तालुक्यातील विखरण येथे जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत आयोजित कार्यक्रमात पालकमंत्री रावल यांच्या हस्ते पशुपालकांना मका व ज्वारीच्या वैरण बियाण्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी उपस्थित पशुपालकांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. पालकमंत्री रावल म्हणाले की, शेतीबरोबरच पशुपालन हा ग्राफ्रीण अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधार आहे. मात्र, दुष्काळाच्या काळात चाऱ्याच्या टंचाईफ्ळे पशुपालकांना अनेक अडचणींचा साफ्ना करावा लागतो. त्याफ्ळे जनावरांच्या चाऱ्याचे योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. मका व ज्वारीसारख्या वैरण पिकांच्या लागवडीतून हिरव्या चाऱ्याची उपलब्धता वाढविता येते. पौष्टिक चाऱ्याफ्ळे जनावरांचे आरोग्य चांगले राहण्यासह दूध उत्पादन टिकविण्यास मदत होते. यासाठी पशुपालकांनी वैरण विकास योजनेचा प्रभावीपणे लाभ घ्यावा.

दुग्ध व्यवसाय हा शेतकरी कुटुंबांसाठी नियमित उत्पन्नाचा महत्त्वाचा स्रोत आहे. सुधारित पशुपालन पद्धती, चाऱ्याचे योग्य व्यवस्थापन आणि उपलब्ध साधनसंपत्तीचा कार्यक्षफ वापर यावर भर दिल्यास हा व्यवसाय अधिक मायदेशीर होऊ शकतो. पशुपालकांनी पारंपरिक शेतीला दुग्ध व्यवसायाची **(पान २ वर)**

भाजपचे हिरालाल चौधरींची मागणी

वाघेश्वर मंदिराच्या टेकडीवर बेकायदेशीर उत्खनन बिल्डरवर कारवाई करून पाचपट दंड वसुल करा

नंदुरबार, दि. २२ (प्रतिनिधी) : नंदुरबार शहराचे भौगोलिक आणि नैसर्गिक सौंदर्याचे प्रतीक असलेल्या तसेच ५०००वर्षांहून अधिक ऐतिहासिक वारसा लाभलेल्या श्री वाघेश्वरी मंदिराच्या टेकडीवर पोकलेन, जेसीबी आणि बुलडोझरच्या साहाय्याने मोठ्या प्रमाणावर उत्खनन सुरू असल्याचा गंभीर आरोप भाजपाचे व विरोधी पक्षनेते हिरालाल चौधरी यांनी केला आहे. टेकडीचे अशा प्रकारे उत्खनन करणे म्हणजे नंदुरबार शहराच्या नैसर्गिक सौंदर्यावर घाला घालण्याचा प्रकार असल्याची भूमिका चौधरी यांनी मांडली. केवळ काही व्यक्तींच्या वैयक्तिक स्वार्थासाठी या टेकडीचे उत्खनन केले जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.

शासकीय व सार्वजनिक मालमत्तेवर सर्वसामान्य नागरिकांचा अधिकार आणि हित जपले गेले पाहिजे. यापूर्वी नागरिकांनी तक्रारी केल्यानंतर प्रशासनाने संबंधित ठिकाणी कारवाई केली होती. मात्र, पुन्हा एकदा याच ठिकाणी पोकलेन, जेसीबी आणि बुलडोझरच्या माध्यमातून उत्खनन सुरू झाले आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने उत्खनन थांबवून संबंधित बिल्डरविरुद्ध कायदेशीर कारवाई करावी, तसेच नियमानुसार पाचपट दंड आकारण्यात यावा, अशी मागणी चौधरी यांनी केली आहे. ऐतिहासिक आणि नैसर्गिक वारसा असलेल्या टेकडीचे संरक्षण करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन कारवाई न झाल्यास भाजपाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, **(पान ४ वर)**

लिपिकांचा पंचवीस पासून संप मंत्रालयाचे काम ठप्प करणार

मुंबई, दि. २२ : मंत्रालयातील लिपिकांच्या प्रलंबित मागण्यांवर शासनाने सकारात्मक निर्णय न घेतल्यास येत्या पंचवीस नोव्हेंबरपासून बेमुदत काम बंद आंदोलन छेडण्यात येणार असल्याचा इशारा मंत्रालयीन लिपिक संघटनेने दिला आहे. वेतनश्रेणीत सुधारणा करणे आणि पदनाम बदलणे या प्रमुख मागण्यांसाठी संघटनेने नोव्हेंबर रोजी मंत्रालयातील आरसा गेट येथे आंदोलन केले होते. आता या आंदोलनानंतरही शासनाने दखल न घेतल्यास मंत्रालयातील कामकाज ठप्प होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेद्वारे निवड **(पान २ वर)**

पदाचा गैरवापर सर्वोच्च न्यायालयाचा दणका; नाव वगळण्याचा आदेश रद्द

धुळे, दि. २२ : शहरातील श्री. स्वामी समर्थ सहकारी गृहनिर्माण संस्था व प्रियदर्शिनी चॅरिटेबल ट्रस्टच्या मालकीच्या मिळकतीच्या मालमत्तापत्रकावर नियमबाह्य फेरफार नोंद व बनावट दस्तऐवज तयार केल्याप्रकरणी मोठा कायदेशीर घटनाक्रम समोर आला आहे. या प्रकरणात एका आरोपीचे नाव फौजदारी खटल्यातून वगळण्याचा उच्च न्यायालयाचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने रद्द केला आहे. संबंधिताचे नाव पुन्हा खटल्यात सामील करण्याचे निर्देश दिले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, धुळे महानगरपालिका हद्दीतील संबंधित मिळकतीवर संगनमत करून गैरकायदा फेरफार नोंद केल्याच्या तक्रारीवरून न्यायालयाच्या आदेशानंतर धुळे शहर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल झाले होते. या प्रकरणी तपास पूर्ण होऊन दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून, खटले न्यायप्रविष्ट आहेत. दरम्यान, संस्थेचे सचिव, प्रियदर्शिनी चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष व ज्येष्ठ पत्रकार अशोक पाटकर यांनी या संदर्भात माहिती दिली.

शासकीय पदाचा आधार घेत संरक्षणाचा मुद्दा उपस्थित करून खटल्यातून नाव वगळण्यात आले होते. त्याविरोधात अशोक पाटकर यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. दिनांक १७ नोव्हेंबर २०२६ रोजी सर्वोच्च न्यायालयाने ही याचिका मंजूर करत नाव वगळण्याचा आदेश रद्द केला व धुळे येथील मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयातील प्रलंबित खटल्यात संबंधित आरोपीचे नाव पुन्हा सामील केले आहे. मनमानी, नियमबाह्य कामकाज आणि पदाचा व अधिकाराचा गैरवापर करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कोणत्याही प्रकारचे कायदेशीर संरक्षण मिळणार नाही, असे **(पान २ वर)**

भरधाव आर्टिगा कार धडकेत तरुणाचा मृत्यू;चालकवर गुन्हा

नंदुरबार, दि. २२ (प्रतिनिधी): शहादा ते खेतिया रोडवरील सुलतानपूर फाटा (ता. शहादा) येथे भरधाव वेगाने आलेल्या आर्टिगा कारने मोटारसायकलला मागून जोरात धडक दिली. त्यात १९ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाला. या प्रकरणी अज्ञात कार चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निलेश विनोद वरसाळे (वय १९ वर्षे, रा. ब्राह्मणपुरी, ता. शहादा, जि. नंदुरबार) असे मृत तरूणाचे नाव आहे. आहे. अपघातानंतर चालक बेपत्ता झाला. वीस नोव्हेंबरला रात्री ७ ते **(पान २ वर)**

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,14,022 रु.+3% GST
सोने- 24 K -1,23,900 रु.+3% GST
चांदी- 1,55,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

फिट युवा, व्यसनमुक्त युवा विद्यावर्धिनी क्रीडा स्पर्धा

धुळे, दि.२२ : विद्यावर्धिनी सभेच्या डॉ. एम. वाय. वैद्य कला, प्रा. पी. डी. दलाल वाणिज्य व डॉ. डी. एस. शाह विज्ञान महाविद्यालय, धुळे येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे दोन दिवसीय क्रीडा स्पर्धा झाल्या. फिट युवा, व्यसनमुक्त युवाया संकल्पनेअंतर्गत क्लस्टरस्तरीयचे आयोजन केले. नशामुक्त युवा विकसित भारत या १०० आठवड्यांच्या संकल्प अभियानाचा एक भाग म्हणून हा उपक्रम पार पडला.

युवकांमध्ये व्यसनमुक्तीविषयी जनजागृती करणे, शारीरिक व मानसिक आरोग्याचे महत्त्व पटवून देणे तसेच क्रीडेद्वारे संघभावना, शिस्त, नेतृत्वगुण आणि सकारात्मक जीवनशैली विकसित करणे हा उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. जनजागृतीपर मार्गदर्शन सत्रात प्रा. डॉ. निलेश रोटे यांनी नशा आणि जीवनाची दशा, डॉ. सर्जेराव गोल्डे यांनी नशामुक्त युवा सशक्त भारत, प्रा. ममता भारुडे यांनी नशा आणि मानसिक आरोग्य, तर डॉ. बाजीराव पाटील यांनी व्यसनाधीनता समाजाला लागलेली कीड या विषयांवर मार्गदर्शन केले. **(पान २ वर)**

संघटन वाढीसाठी खा. राऊतांचा नंदुरबार दौरा जिल्ह्यातून शिवसेनेचे दोन आमदार : साळुंखे

नंदुरबार, दि. २२ (प्रतिनिधी) : भाजप सरकारने शेतकरी आणि गरीब जनतेची निराशा केली असून, शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहिले जात नाही. दुष्काळ, पाणीटंचाई, पीकविफ्ा आणि शासकीय योजनांच्या अंफ्लबजावणीतील त्रुटींफ्ुळे ग्राफ्रीण जनता त्रस्त आहे. या प्रश्नांवर सरकारला जाब विचारून जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी शिवसेना रस्त्यावर उतरून संघर्ष करेल, असा इशारा शिवसेनेचे राज्य संघटक तथा नंदुरबार लोकसभा संपर्कप्रफ्ुख मुकेश साळुंखे यांनी दिला.

आदिवासी सफ्जाचे प्रश्न, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणी, शेतकऱ्यांच्या सफ्स्या आणि प्रशासकीय अनास्था या विषयांना राज्यस्तरावर वाचा मोडण्यासाठी शिवसेना नेते खासदार संजय राऊत यांचा नंदुरबार जिल्हा दौरा आयोजित करण्यात येणार असल्याची महत्त्वपूर्ण घोषणा साळुंखे यांनी केली. नंदुरबार जिल्ह्यात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची संघटनात्फ्क ताकद वाढविण्यावर भर देण्यात येणार आहे. पक्ष प्रत्येक गाव आणि पाड्यापर्यंत पोहोचविणे, नवीन कार्यकर्त्यांना जोडणे आणि जनतेच्या प्रश्नांवर सातत्याने संघर्ष करणे हे उद्दिष्ट आहे. आगाफी काळात नंदुरबार जिल्ह्यातून पक्षाचे दोन आफ्दार निवडून आणण्याचा निर्धारही साळुंखे यांनी व्यक्त केला.

यावेळी जिल्हाप्रफ्ुख पंडित माळी यांनी सांगितले की, यंदाच्या दुष्काळी परिस्थितीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष शेतकरी आणि आदिवासी जनतेच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. या परिस्थितीचा सर्वांनी मिळून साफ्ना करणे आवश्यक आहे. शासनाकडून शेतकरी व आदिवासी बांधवांची दिशाभूल केली जात असून, त्यांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी लवकरच खासदार संजय राऊत यांचा नंदुरबार येथे मेळावा आयोजित करण्यात येणार आहे. हा मेळावा सर्वांनी एकजुटीने यशस्वी करावा, असे आवाहन त्यांनी केले. या तीन दिवसीय दौऱ्यात जिल्ह्यातील विविध साफ्जिक, शैक्षणिक, कृषी आणि प्रशासकीय प्रश्नांचा आढावा घेण्यात आला. या प्रश्नांवर शासनाला धारेवर धरण्यासाठी आगाफी काळात पक्षाच्या वतीने आंदोलनात्फ्क भूमिका घेतली जाणार असल्याचे संकेतही यावेळी देण्यात आले.

यावेळी राज्य संघटक तथा नंदुरबार लोकसभा संपर्कप्रफ्ुख मुकेश साळुंखे, जिल्हाप्रफ्ुख पंडित माळी, महिला जिल्हाध्यक्ष रीना पाडवी, **(पान २ वर)**



आपला महाराष्ट्र

सनदी अधिकारी सेवा मुक्त होण्याचे वाढते प्रमाण

प्रशासकीय सेवांमधील उच्चपदस्थ पदे सोडण्याची प्रवृत्ती अलीकडच्या काळात मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. प्रचंड मेहनत आणि कष्ट घेऊन परीक्षा उत्तीर्ण होऊन सरकारचा कारभार चालविणाऱ्या आयएएस, आयपीएस, आयएफएस यांसारखी प्रतिष्ठित पदे मिळविणारे अधिकारी अखेर आपली पदे सोडून अन्य क्षेत्रांत जाऊ लागले आहे याचा शोध घेण्याचा प्रयतक ज्यांनी ज्यांनी केला त्यांना वेगवेगळे अनुभव आले आहेत.एकेकाळी ज्या प्रशासकीय सेवेला देशाच्या शासनव्यवस्थेचा सर्वांत मजबूत कणा आणि तरुणांच्या स्वप्नांचे शिखर मानले जात होते, त्याच सेवेतील अधिकारी आज मधेच नोकरी सोडत आहेत. काही जण राजकारणाकडे वळत आहेत, काही खासगी क्षेत्रातील संधींच्या शोधात आहेत, तर काही वर्षानुवर्षे सेवा केल्यानंतरही व्यवस्थेबाहेर पडण्याचा निर्णय घेत आहेत.प्रश्न केवळ अधिकारी नोकरी का सोडत आहेत, एवढाच नाही. तर देशातील सर्वाधिक प्रतिभावान तरुण पिढीचा या व्यवस्थेतील रस कमी होण्यामागे नेमके काय कारण आहे, हा खरा प्रश्न आहे. प्रशासकीय सेवेतील अधिकारीच व्यवस्थेपासून दूर जात असतील, तर त्यामागे काही गंभीर कारणे असली पाहिजेत.

देशाचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी ज्या प्रशासकीय व्यवस्थेला राष्ट्राची एकात्मता आणि शासनाच्या स्थैर्याचा आधार मानले होते, तिची सर्वांत मोठी ताकद निष्पक्ष, सक्षम आणि कर्तव्यनिष्ठ अधिकारी हीच होती. संघ लोकसेवा आयोगाची कठीण परीक्षा उत्तीर्ण करून प्रतिष्ठा, सुरक्षितता आणि व्यापक अधिकार असलेल्या सेवेत प्रवेश करणारे अधिकारी मधेच आपली नोकरी सोडत असतील, तर त्याकडे केवळ वैयक्तिक महत्त्वाकांक्षा म्हणून पाहून चालणार नाही. हा त्या व्यवस्थेच्या कार्यसंस्कृतीचा आणि विश्वासार्हतेचा प्रश्न आहे.मध्य प्रदेश हे या प्रवृत्तीचे एक महत्त्वाचे उदाहरण आहे. गेल्या काही वर्षांत येथे अनेक आयएएस अधिकाऱ्यांनी निर्धारित निवृत्तीवयापूर्वीच सेवा सोडण्याचा पर्याय निवडला आहे.कुणी खासगी क्षेत्रातील संधी निवडली, कुणी स्वतंत्र जीवनाचा मार्ग स्वीकारला, तर कुणी राजकारणाची वाट धरली. या निर्णयांमागील कारणे वेगवेगळी असली, तरी एक समान प्रश्न उपस्थित होतो.आजची सरकारी सेवा प्रतिभावान अधिकाऱ्यांसाठी पूर्वीइतकी आकर्षक आणि समाधानकारक राहिलेली नाही .

या बदलामागील पहिले आणि सर्वांत गंभीर कारण म्हणजे प्रशासकीय स्वायत्ततेचा सातत्याने होत असलेला ऱ्हास. होय.लाचारी हे आणखी एक कारण असावे.लोकशाहीमध्ये निवडून आलेल्या सरकारला धोरणे ठरविण्याचा अधिकार आहे; परंतु प्रशासकीय अधिकाऱ्यांची जबाबदारी संविधान आणि कायद्याप्रती असली पाहिजे, एखाद्या राजकीय व्यक्ती किंवा पक्षाप्रती नव्हे. जेव्हा बदल्या या दंड आणि पुरस्काराचे साधन बनतात, पदस्थापना राजकीय हितसंबंधावर अवलंबून राहतात तेव्हा प्रशासकीय निष्पक्षता कमकुवत होते. जनहिताचे निर्णय घेण्याऐवजी स्वत:चे पद सुरक्षित ठेवण्याची चिंता अधिकाऱ्यांना सतावू लागते.

दुसरे संकट म्हणजे उत्तरदायित्वाच्या व्यवस्थेचा अभाव. दारूच्या विषारी सेवनामुळे मृत्यू होत असतील, बेकायदा खाणकामाचा व्यवसाय सुरू असेल, व्यवस्था बिघडत असेल, तर एसपी अथवा जिल्हाधिकाऱ्यांना हटविणे ही सरकारची सर्वांत सोपी राजकीय प्रतिक्रिया असते. प्रत्येक अपयशासाठी केवळ जिल्हाधिकारीच जबाबदार असतात ही चूक आहे. तिसरे कारण म्हणजे पदस्थापना आणि कार्यकाळाबाबतची अनिश्चितता होय.अधिकाऱ्यांना मनमानी हस्तक्षेपापासून वाचविणे हा या व्यवस्थांचा पूर्वी उद्देश होता. परंतु या उपाययोजना प्रभावी ठरल्या नाहीत, तेव्हा प्रशासकीय स्थैर्य कसे निर्माण होणार असा प्रश्न आहे .ज्या अधिकाऱ्याला प्रत्येक वेळी बदली होण्याची भीती असेल, त्याच्याकडून दीर्घकालीन सुधारणा आणि निर्भय निर्णयांची अपेक्षा पूर्ण होऊ शकणार नाही. म्हणजे पदस्थापना आणि कार्यकाळाबाबतची अनिश्चितता. अशी काही कारणेही असतात.

आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे खासगी क्षेत्राचे वाढते आकर्षण. आज प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे तांत्रिक, व्यवस्थापन, कायदा, वित्त आणि धोरणनिर्मितीचा अनुभव आहे. कॉर्पोरेट कंपन्या, आंतरराष्ट्रीय संस्था आणि सल्लागार संघटना या अनुभवाचा उपयोग करू इच्छितात. चांगले वेतन, व्यावसायिक स्वातंत्र्य आणि नव्या संधी त्यांना आकर्षित करतात. याला केवळ सरकारी व्यवस्थेचे अपयश म्हणणे योग्य ठरणार नाही; पण सार्वजनिक सेवेत मिळविलेल्या विशेष अनुभवाचा अधिक चांगला उपयोग व्हावा, यासाठी सरकार काय करीत आहे, हा प्रश्न निश्चितच उपस्थित होतो.

पाचवे कारण म्हणजे आदर्शवाद आणि प्रशासकीय वास्तव यांच्यातील संघर्ष. तरुण अधिकारी संविधान, सामाजिक न्याय आणि लोककल्याणाच्या आकांक्षा घेऊन सेवेत येतात; परंतु व्यवस्थेचा मोठा भाग अनेकदा फायली, औपचारिकता, व्हीआयपी प्रोटोकॉल आणि राजकीय प्राधान्यक्रमांमध्ये अडकलेला असतो. केंद्र सरकारच्या २०१० च्या सिव्हिल सर्व्हिस सर्व्हेक्षणामध्ये ४,८०८ अधिकाऱ्यांच्या उत्तरांपैकी ७५.१ टक्के अधिकाऱ्यांनी यशस्वी योगदान देता न येण्याच्या निराशेमुळे सेवा सोडण्याचा विचार करणे महत्त्वाचे असल्याचे मानले होते. ६९.६ टक्के अधिकाऱ्यांनी राजकीय हस्तक्षेप आणि उत्साहाचा अभाव, तर ७८.४ टक्के अधिकाऱ्यांनी बेहिशेबी कार्यभार आणि खासगी क्षेत्रातील संधी यांना महत्त्वाचे मानले. हे आकडे सांगतात की प्रशासकीय असंतोषाची मुळे बरीच जुनी आहेत.

या चर्चेचा दुसरा पैलूही दुर्लक्षित करता येणार नाही. प्रत्येक राजीनामा म्हणजे व्यवस्थेविरुद्धचा बंडखोरीचा पुरावा नसतो आणि प्रत्येक व्हीआरएस म्हणजे राजकीय शोषणाचा परिणाम नसतो. नोकरीच्या काळातही गटबाजी, पद आणि प्रभाव यांच्यातील स्पर्धा, जबाबदारीपासून दूर राहण्याची प्रवृत्ती आणि भ्रष्टाचाराच्या समस्या अस्तित्वात असतात. त्यामुळे अधिकाऱ्यांच्या राजीनाम्यांचा निष्पक्षपणे अभ्यास होणे आवश्यक आहे. समस्येचे निराकरण कोणाला तरी दोषी ठरवून नव्हे, तर संस्थात्मक सुधारणांमधून होऊ शकते.

सरकारला किमान कार्यकाळाच्या नियमांचे पालन करावे लागेल, समयोचित बदल्यांचे तक्ते सार्वजनिक करावे लागतील आणि नागरी सेवा मंडळ प्रभावी करावे लागेल. प्रशासकीय अपयशांची चौकशी केवळ कनिष्ठ अधिकाऱ्यांपुरती मर्यादित न राहता संरक्षण देणाऱ्या व्यवस्थेपर्यंत पोहोचली पाहिजे. केंद्र आणि राज्यांनी अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा तसेच व्हीआरएसचा एकत्रित आकडा सार्वजनिक केला पाहिजे.पोलादी मजबुती केवळ नियुक्त अधिकाऱ्यांच्या संख्येवर अवलंबून नसते, तर त्या व्यवस्थेत काम करणाऱ्या अधिकाऱ्यांची निष्पक्षता, निर्णयक्षमता आणि व्यावसायिक स्वातंत्र्य यांवर अवलंबून असते. प्रतिभावान अधिकाऱ्यांनी सेवेतून बाहेर पडणे हे नेहमीच व्यवस्थेचे अपयश नसते; परंतु त्यांच्या जाण्यामागे संस्थात्मक असंतोष, अस्थिरता आणि स्वायत्ततेचा अभाव असेल, तर ही लोकशाही शासनव्यवस्थेसाठी गंभीर चिंतेची बाब आहे.सरकारी सेवेत सक्षम असलेल्या अधिकाऱ्यांची जर स्थिती अधांतरी असेल तर ते खाजगी क्षेत्राकडे वळणे अस्वाभाविक नाही याचा विचार धोरण कर्त्यांनी केला पाहिजे.

नेपाळचे पंतप्रधान बालेन शाह व मोदींची ऐतिहासिक भेट

नवी दिल्ली, दि. २२ : नेपाळचे पंतप्रधान बालेन्द्र बालेन शाह दोन दिवसांच्या भारत दौऱ्यासाठी नवी दिल्लीत दाखल झाले आहेत. नेपाळचे पंतप्रधान झाल्यानंतरचा हा त्यांचा पहिलाच परदेश दौरा आणि पहिलाच भारत दौरा आहे. त्यामुळे या भेटीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निमंत्रणावरून होत असलेल्या या दौऱ्यात बालेन शाह हे पंतप्रधान मोदी आणि राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना नेपाळच्या समृद्ध इतिहास व संस्कृतीशी जोडलेल्या खास भेटवस्तू देणार आहेत.

रातो मच्छिंद्रनाथ यांची मूर्ती

या दौऱ्यात बालेन शाह पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना रातो मच्छिंद्रनाथ यांची मूर्ती भेट देणार आहेत. नेपाळच्या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेत रातो मच्छिंद्रनाथ यांना विशेष स्थान आहे. काठमांडू खोऱ्यात या देवतेची प्रमुख देवता म्हणून पूजा केली जाते. पारंपरिक मान्यतेनुसार, लिच्छवी राजवंशातील राजा नरेंद्र देव यांनी रातो मच्छिंद्रनाथ यांना सध्याच्या आसाममधून काठमांडू खोऱ्यात आणले होते. त्यामुळे ही भेट भारत आणि नेपाळमधील प्राचीन सांस्कृतिक संबंधांचे प्रतीक मानली जात आहे.

राष्ट्रपती मुर्मू यांना सांस्कृतिक भेट

बालेन शाह राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनाही नेपाळच्या इतिहासाशी संबंधित चारुमती विहाराशी जोडलेली खास भेटवस्तू देणार आहेत. या भेटवस्तूंच्या माध्यमातून भारत आणि नेपाळ यांच्यातील ऐतिहासिक, धार्मिक आणि सांस्कृतिक संबंधांना अधोरेखित करण्याचा प्रयतक आहे. नेपाळच्या पंतप्रधानांचा हा दौरा केवळ राजनैतिक दृष्टिकोनातूनच नव्हे, तर दोन्ही देशांमधील ऐतिहासिक मैत्री आणि सांस्कृतिक संबंध अधिक दृढ करण्याच्या दृष्टीनेही महत्त्वाचा मानला जात आहे.

जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था, सावकार व सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे वर्णन असलेली मिळकत आमचे पक्षकार श्री.अनंत सुभाष पाटील रा.हडपसर, पुणे यांनी मिळकतीचे मालक अश्विनी राजेंद्र धात्रक, प्रविण वाल्मिक साबळे व प्रज्ञा चंदकांत साबळे यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचा सौदेकरार केलेला आहे सौदेपोटी त्यांना आमचे पक्षकार यांनी बयाना रक्कम देखील अदा केलेली आहे. तसेच खरेदीचा व्यवहार हा मुदतीत होणार आहे.

मिळकतीचे वर्णन- तु.जि.धुळे पो.तु.ता. जि.धुळे, पैकी मौजे वलवाडी, देवपूर ता.जि. धुळे येथील वलवाडी शिवारातील धुळे महानगरपालिका हद्दीतील सर्व्हे नं.१७/१अ यापैकी प्लॉट नं.४१ चे क्षेत्र उत्तरेकडील ०.७५ चौ.मी. प्रज्ञा चंद्रकांत साबळे व दक्षिणेकडील ०.७५ चौ.मी. अश्विनी राजेंद्र धात्रक व प्रविण वाल्मिक साबळे यांचा सामाहिक मालकिचा असे एकूण ११० चौ.मी. बखळ जागा त्यासी चतुर्सि:मा या मंजुर ले आउटप्रमाणे आहेत.

तरी वर नमूद वर्णनाची मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचे सौदा, करार, बक्षीस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह ॲण्ड लायसन्स, भाडेपट्टा वारस, हक्क, मुखत्यार, मृत्युपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, कुळ, अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचे हक्क व अधिकार असतील तसेच न्यायिक व इतर प्रकरणे असल्यास पुराव्यानिशी लेखी हरकती वरील पत्त्यावर सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत नोंदवाव्यात. ७ व्या दिवसांनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरण्यात येणार नाहीत. तसेच परस्पर वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेल्या हरकती देखील विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. तसेच मुदतीनंतर आलेल्या हरकती आमच्या अशिलावर व वर नमुद मिळकतीवर बंधनकारक राहणार नाहीत व सदर मिळकत निर्बोज व हस्तांतरणीय आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील याचीही नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

धुळे, दि.२२/११/२०२६.

ॲड.योगेश जी.खैरनार
नोटरी (भारत सरकार)
३९, भगवती नगर,
बीबीसी हॉटेल मागे, देवपूर, धुळे.
मो.नं.९८२२६२७३६१
९४२३७३६७२९

प्रकाश में आज- वेलकम टु जंगल



अक्षयकुमार सुनिल शेट्टी जॉकी श्राफ परेशरावल तुषार कपूर रविना टंडन

पान १ वरुन

विखरणला वैरण बियाण्यांचे वाटप

जोड देऊन आर्थिक प्रगती साधावी, असेही त्यांनी सांगितले.

वैरण बियाणे वाटपातून प्रोत्साहन

जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमचा उद्देश पशुपालकांना वैरण पिकांच्या लागवडीस प्रोत्साहन देऊन गावपातळीवर चाऱ्याची उपलब्धता वाढविणे हा आहे. विशेषतः चारा टंचाईच्या काळात पशुधनाच्या संगोपनासाठी आवश्यक चाऱ्याची व्यवस्था करण्यास या उपक्रमची मदत होणार आहे. या कार्यक्रमस दोंडाईचा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नारायण पाटील, शिंदखेडा पंचायत समितीचे माजी सभापती जिजाबराव पाटील, भाजपचे जिल्हा डी. एस. गिरासे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य पंकज कदफ, भूपेंद्र गिरासे, जिल्हा परिषदेचे माजी सभापती धनंजय मंगळे, शिंदखेडा पंचायत समितीचे माजी सभापती रणजित गिरासे, उद्योजक रफेश टाटिया, विखरणचे सरपंच महेंद्र पवार, माजी सरपंच हिरामण तायडे, विठ्ठल पाटील, उपसरपंच रफेश पाटील, सत्यजित गिरासे, सोनशेलूचे सरपंच धीरज बडगुजर, काममूरचे सरपंच विष्णू पाटील यांच्यासह पंचक्रोशीतील पदाधिकारी, शेतकरी व पशुपालक उपस्थित होते.

कार्यक्रमच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय डॉ. गिरीश पाटील, शिंदखेडा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी रफेश नेतनराव, तालुका पशुधन विकास अधिकारी डॉ. भूषण वाकडे, सहाय्यक उपायुक्त डॉ. साळुंखे, विखरणच्या पशुधन विकास अधिकारी डॉ. रूपाली काटे, श्री. राजभोज, सोहनलाल राठोड, नरहर पाटील, अनिल लोहार, अमित नजन, गुलजारसिंग गिरासे, योगेश जाधव, गौरव म टकाळ, निलेश पाचपोळ, संतोष उगलफुाले, ओफ्रकाश सोनवणे, संजय पाटील, पांडुरंग चव्हाण, नंदकिशोर पाटील व कुरेशी शेख यांनी परिश्रफ घेतले.

लिपिकांचा पंचवीस पासन संप मंत्रालयाचे काम ठप्प करणार

झालेले मंत्रालयीन लिपिक शासनाच्या अत्यंत महत्त्वाच्या कामकाजाची जबाबदारी सांभाळतात. मंत्रीमंडळ व विधिमंडळाचे कामकाज, धोरणात्मक निर्णय, न्यायालयीन प्रकरणे तसेच शासन निर्णयांचे गोपनीय मसुदे तयार करण्यासारखी महत्त्वाची कामे त्यांच्यामार्फत केली जातात. मात्र, एवढी महत्त्वाची जबाबदारी पार पाडूनही कर्मचाऱ्यांना मिळणारे वेतन अत्यंत कमी असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. मुंबई सारख्या महागड्या शहरात नव्याने रुजू झालेल्या लिपिकाला साधारण पस्तीस हजार रुपये वेतन मिळते. घरभाडे, मुलांचे शिक्षण, कुटुंबाचा उदरनिर्वाह आणि प्रवासखर्च भागविताना हे वेतन अपुरे पडत असल्याचा दावा संघटनेने केला आहे. वेतनवाढीचा प्रश्न प्रलंबित राहिल्याने कर्मचाऱ्यांच्या आर्थिक व मानसिक आरोग्यावर परिणाम होत असून अनेक तरुण कर्मचारी नोकरी सोडून जिल्हास्तरीय सेवांकडे वळत आहेत.

पदाचा गैरवापर सर्वोच्च न्यायालयाचा

सर्वोच्च न्यायालयाने या निर्णयाद्वारे स्पष्ट केले आहे. या निकालामुळे सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळण्याचा मार्ग अधिक सुलभ झाल्याचे अशोक पाटकर यांनी सांगितले.

भरधाव आर्टिगा कार धडकेत तरुणाचा मृत्यू;चालकवर गुन्हा

७.३० वाजेच्या सुमारास निलेश वरसाळे हा त्याची मोटारसायकल क्र. एम.एच.-३९ टी-८०९१ हिच्याने कामावरून ब्राह्मणपुरी येथे घरी परत होता. त्यावेळी सुलतानपूर फाटा येथे खेतियाकडून शहाद्याकडे येणाऱ्या पांढऱ्या रंगाच्या मारुती सुझुकी आर्टिगा गाडी क्र. एम.पी.०९ डी.सी. ७५५९ हिचेवरील चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने चालवीत मोटारसायकलला धडक दिली. या अपघातात निलेश वरसाळे याचा मृत्यू झाला. मृताचे वडील विनोद संतोष वरसाळे (वय ४६ वर्षे, धंदा मजुरी, रा. हनुमान चौक, ब्राह्मणपुरी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलिस कर्मचारी विकास कापुरे करीत आहेत.

संघटन वाढीसाठी खा. राऊतांचा नंदुरबार दौरा

युवासेना जिल्हाप्रफुख सागर पाटील, जिल्हा सचिव दिनेश सोनवणे, उपजिल्हाप्रफुख डॉ. हेफ्रंत शर्फा, महिला तालुकाध्यक्ष चारु बागुल, तालुकाध्यक्ष रफेश पाटील, दिनेश भोपे, शेखर जाधव, अल्पसंख्याक आघाडी प्रफुख इम्तियाज पटेल, व्यापारी असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष बापू महाजन, मन्नान गणी शिकलीकर, इम्तियाज खान, खंडू माळी, महिला आघाडीच्या शहराध्यक्ष संगीता माळी, दिपाली वाघ, महिला आघाडीच्या उपजिल्हाध्यक्ष सोनल चव्हाण, जयश्री सोनवणे, किसान सेनेचे तालुकाप्रफुख निंबा पाटील, उपजिल्हाप्रफुख हसफुख पाटील, अनिल वारुळे, नवापूर शहरप्रफुख कल्पित नाईक, तालुकाप्रफुख देवका पाडवी, तालुका संघटक दिनेश भोई, युवासेना उपजिल्हाधिकारी किशन शिरसाठ, युवासेना तालुकाप्रफुख सचिन चौधरी, मि रोज खाटीक, मनोहर चौधरी, राजेश जयस्वाल, प्रफ्रेद वाघ, महेंद्र गावित, अजित गावित, सुनील गावित, आकाश गावित, दिनेश खैरनार, भरत गुरव, गोपाळ राजपूत, रवींद्र देसले यांच्यासह स्थानिक शिवसैनिक, आदिवासी भगिनी आणि ग्राफस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रफचे सूत्रसंचालन जिल्हा सचिव दिनेश सोनवणे यांनी केले.

पान १ वरुन

अनुदानित युरियाचा काळ्या बाजारात विक्रीचा प्रयत्न

येथील कृषी अधिकारी अभय नथू कोर आणि तालुका कृषी अधिकारी कार्यालय, शहादा येथील विशाल वाकचौरे यांना शहादा येथून अनुदानित युरिया भरलेली टाटा कॅम्पनीची लाल रंगाची बंद कॅंटेनर मालवाहू गाडी क्र. चक एम.एच.४८ सी.कियू.९४५७ दोंडाईच्याच्या दिशेने निघाल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यांनी या गाडीचा पाठलाग केला असता गाडी दोंडाईचा मार्गे लामकानी (धुळे) दिशेने गेल्याचे समजले. त्यानंतर अभय कोर व विशाल वाकचौरे यांनी धुळे पंचायत समितीचे कृषी अधिकारी तथा धुळे तालुक्याचे खत निरीक्षक जगदीश सदाशिव बोराळे यांना माहिती दिली. बोराळे यांनी सोनगीर पोलीस ठाण्याशी संपर्क साधून पो.उ.नि. किरणसिंग राजपूत व पो.कॉ. नितीन जाधव यांना सोबत घेत खासगी वाहनाने क्र. चक एम.एच.१८ बी.आर. ८३५५ शेवाळे गावातून लामकानी चौफुली गाठली आणि सायंकाळी सुमारे ६.१० वाजता संशयित कॅंटेनर येताना दिसताच तो थांबवण्यात आला. पंचांची तसेच शासकीय साक्षीदार अभय कोर, विशाल वाकचौरे, जिल्हा गुणनियंत्रण निरीक्षक अरुण तायडे आणि प्रदीप पाटील यांच्या उपस्थितीत वाहनाची तपासणी करण्यात आली. चालकाने कॅंटेनरचे कुलूप उघडल्यानंतर आत गुजरात नर्मदा व्हॅली फर्टिलायझर्स अँड केमिकल्स लिमिटेड (नर्मदा नगर, जि. भरूच, गुजरात) निर्मित ४५ किलो वजनाच्या युरियाच्या २७० गोण्या आढळून आल्या, ज्यांची किंमत ६७,५०० रुपये आहे. यासोबत टाटा मॉडिल १९१० कॅंटेनर क्र.एम.एच. ४८ सि.कियू.९४५७ अंदाजे १८,००,००० रुपये किमतीचा असा एकूण १८,६७,५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या युरियाचा बॅच क्र. २६/११/०३ असून उत्पादन तिथी नोव्हेंबर २०२६ अशी आहे. चालक मो. ताहीर तसउवर अहमद (रा. जमालुद्दीनपूर, खुटहन, जि. जौनपूर-२२३१०४, उत्तर प्रदेश) याने हा माल मे. अब्दुल्ला भाई युसुफजी अँड सन्स (साईबाबा मंदिरासमोर, शहादा) येथून भरल्याचे व आर.आर. ट्रान्सपोर्टचे मालक राजेंद्र राठोड यांच्या सांगण्यावरून धुळे दिशेने नेत असल्याचे सांगितले. धुळे येथे आल्यावर पुढे कोठे जायचे हे राठोड सांगणार होते, असे त्याने पोलिसांना सांगितले आहे . चालकाने सादर केलेल्या डिलेव्हरी मेमो क्र. ४२४ (दि. १९/११/२०२६) वर महावीर कृषी सेवा केंद्र, खांडबारा असे नमूद असून गाडीचा क्रमांक एम.एच.४८ सि.कियू.९४७४ लिहिल्याचे आढळले. खत निरीक्षक जगदीश सदाशिव बोराळे यांच्या फिर्यादीवरून दि. २० नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी मादभाई (माद मस्तानशीर मर्चेंट), मालक मे. अब्दुल्ला भाई युसुफजी अँड सन्स, रा. शहादा, जि. नंदुरबार , राजेंद्र राठोड, रा. वसई-विरार , जित् सुरेश परदेशी, मालक महावीर कृषी सेवा केंद्र, रा. खांडबारा आणि चालक मो. ताहीर तसउवर अहमद, रा. जमालुद्दीनपूर, खुटहन, जि. जौनपूर, उत्तर प्रदेश या संशयित आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला. अनुदानित खताची पीओएस मशिनशिवाय विक्री, जिल्ह्याबाहेर स्वत:च्या फायद्यासाठी वाहतूक, औद्योगिक वापरासाठी संभाव्य विक्री व शासनाचे अनुदान लाटून फसवणूक केल्याप्रकरणी खत नियंत्रण आदेश १९८५, रासायनिक खत वाहतूक आदेश १९७३, जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ तसेच भारतीय न्याय संहिता बि.एन.एस २०२३ च्या कलम ३१६ व ३१८(४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, अटक करण्यात आलेल्या संशयित वाहन चालकाला न्यायालयात हजर केले असता त्याला तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक तुषार देवरे हे करीत आहेत.

मौजे वरवाडे ता.शिंदखेडा जिल्हा धुळे येथील गट क्र.४७/१/४७/२क बाबतची जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन:- जिल्हा धुळे तालुका शिंदखेडा मौजे वरवाडे येथील गट नं.४७/१/४७/२क पैकी प्लॉट नं.११५, १९, २३, २९, ३० असे पाच बखळ प्लॉट्स जागा मिळकत यासी चर्तु:सिमा नकाशा प्रमाणे

वर नमुद वर्णन केलेले बखळ प्लॉट मिळकत ही १) शेख मोहम्मद नुरमजान मनियार २) इसाक शेख सुभान ३) रफिक शेख इब्राहीम ४) अशपाक शेख इब्राहीम सा.धुळे यांच्या मालकी व प्रत्यक्ष कब्जे ताबे उपभोगातील आहे. सदर मिळकत आमचे अशिल १) इलियास रशीद खाटिक २) खाटीक अल्तमश अल्ताब यांनी इम्रान खान मसूद खान पठाण यांचेशी केला आहे बयाणा रक्कम दिली गेली आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीच्या बाबतीत सरकारी, निमसरकारी संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर कोणाचाही खाजगी हक्क, हिस्सा, अधिकार, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लीज, सौदा, करार, मुखत्यार, मृत्यूपत्र, पोटगी, अन्नवस्त्र, कोर्टजप्ती, दावा, कोर्टवाद, सॉल्वन्सी, आरक्षण, हितसंबंध, देणे घेणे वगैरे असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर मिळकती संबंधीत योग्य ते कागदपत्रानीशी प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोंदवावी. अन्यथा सदरची मिळकत पूर्णपणे निर्वेध व निर्बोज आहे असे समजून अथवा कोणाचे हक्क, हितसंबंध असल्यास ते त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेले आहेत असे समजून सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे. असे समजून संबंधीतास तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमानपत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर तसेच नमूद मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस पक्षकारांनी दिलेल्या माहिती अधिकार व दाखविलेल्या कागदपत्रांच्या आधारे आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे, दिनांक- २१/११/२०२६.

ॲड.जमील खान एस.पठाण
पत्ता- चेंबर नंबर १०७, जिल्हा न्यायालय आवार, स्टेशन रोड, धुळे.
मो.नं.९८२३०६८५०७/८६६९११७६५८

पान १ वरुन

फिट युवा, व्यसनमुक्त युवा विद्यावर्धिनी क्रीडा स्पर्धा



वक्त्यांनी व्यसनाचे शारीरिक, मानसिक, सामाजिक व कौटुंबिक दुष्परिणाम स्पष्ट करून युवकांनी व्यसनांपासून दूर राहून निरोगी आणि सकारात्मक जीवन जगण्याचे आवाहन केले. उपस्थितांना व्यसनमुक्तीची शपथ दिली. या अभियानांतर्गत बॉल बॅडमिंटन, बॅडमिंटन, कबड्डी, रस्सीखेच, व्हॉलीबॉल, फुटबॉल, बास्केटबॉल यांसह फुगडी, लंगडी, धप्पाधप्पी, भुलई आदी पारंपरिक खेळांच्या स्पर्धा झाल्या.

या दोन दिवसीय उपक्रमामुळे क्रीडा स्पर्धा आणि व्यसनमुक्तीविषयक मार्गदर्शन यांच्या माध्यमातून युवकांपर्यंत निरोगी व व्यसनमुक्त जीवनशैलीचा संदेश प्रभावीपणे पोहोचविण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. बाजीराव पाटील, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. राजीव आर. के., महिला सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रतीक्षा पाटील, स्वयंसेवक, प्राध्यापक, कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

शब्दकोडे क्रमांक.२४९७

१	२		३	■	४	५		■	६	७	
८		■	९				■	१०	■		■
	■	११		■		■	१२	■	१३		१४
■	१५	■	१६	१७	■	१८				■	
१९			■	२०				■	२१	२२	
२३		■	२४		■		■	२५			■
	■	२६	■	२७		■	२८		■	२९	३०
■	३१		३२		■	३३	■	३४	३५	■	
३६	■	३७		■	३८		३९	■	४०	४१	
४२		■	४३	४४		■	४५	४६	■		■
	■	४७	■	४८		४९	■	५०	५१		५२
■	५३				■	५४		■	५५		

आडवे शब्द : १.पुष्कळ ४.राक्षस ६.उनाड ८.तीळ ९. केलेली झाडांची जोपासना ११.माता १३.शेळी १६.स्त्रियांच्या नाकातील एक दागिना १८.नादमय १९.शाहरूख खानचा पहीला हिंदी सिनेमा २०.पाठवणी २१.खांदा आणि मनगट यांमधील सांदा २३.चोप २४.मंद गतीचा २५.आवरण २७.रस्ता २८.दंत २९.दमयंतीचा पती ३१.कडू चवीचा ३४.आकाश ३७.तंटा ३८.चिंतन ४०.बाधा ४२.रिकामा ४३.रोख ४५.उणे ४८.माकड ५०.पारसी नववर्ष ५३.हददपार केलेला ५४.दोन आणि एक मिळून तयार होणारी संख्या ५५.लाकड जाळून तयार केलेले इंधन **उभे शब्द :** १.माधवाचा एक बुटू अवतार २.शर्यत-इंग्रजीत ३.पळ ४.मेजवाणी ५.गरज ७.वादय वाजवणारे १०.इंग्रजीत-नाही १२.एक चर्मवादय १३.पचनाशी सबंधीत एक आजार १४.इंग्रजीत-वाचक १५.अमिताभ बच्चन,शशी कपूर यांचा एक सिनेमा १७.लक्ष्मीकांतबेर्डे यांचा अंगाचा थरकाप उडवून देणारा एक सिनेमा १८.मुंबईला पाणी पुरवठा करणारा एक जलाशय १९.अकल १२.ननप-उलट लिहा २५.पगार २६.उभा-विरूदध ३०.क्षार ३२.मुख ३३.तलवार ठेवण्याची कुपी ३



रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान — रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान

धुळे शहरात २३ ते २७ नोव्हेंबर काळात मनशक्ती ज्ञानप्रकाश यात्रेतून मार्गदर्शन

धुळे, दि. २२ : मुलांच्या व्यक्तीमत्वाचा सर्वांगीण विकास व्हावा, प्रत्येक व्यक्ती मानसिकदृष्ट्या सक्षम होऊन सुखी जीवन जगावे, या उद्देशाने पन्नास वर्षांपासून कार्यरत असलेल्या मनशक्ती प्रयोगकेंद्रा तर्फे धुळे शहरात २३ ते २७ नोव्हेंबर दरम्यान मनशक्तीची ज्ञानप्रकाश यात्रा आयोजित करण्यात आली आहे. या यात्रेअंतर्गत विद्यार्थी, पालक, शिक्षक तसेच विविध सामाजिक घटकांसाठी विनामूल्य मार्गदर्शनपर कार्यक्रम घेण्यात येणार आहेत.

लोणावळा येथील मनशक्ती प्रयोगकेंद्राच्या मुख्य केंद्रात दरवर्षी सर्व वयोगटातील हजारो लोक विविध उपक्रमांमध्ये सहभागी होतात. सध्याच्या काळातील मानसिक समस्या, आजार, मानसिक अस्वास्थ्य, मुलांच्या समस्या आणि ताणतणाव यावर अभ्यासवर्गांच्या माध्यमातून मार्गदर्शन केले जाते. प्रत्येक व्यक्तीमध्ये समस्या सोडविण्याची क्षमता असून, जगण्याचे विज्ञान आत्मसात केल्याने ही क्षमता विकसित होऊन जीवनातील आव्हानांना धैर्याने सामोरे जाण्याचे सामर्थ्य मिळते, असा मनशक्तीचा दृष्टिकोन आहे. मुलांना संस्कारी, आरोग्यसंपन्न आणि कर्तबगार बनविण्यासाठी मेंदूशास्त्रावर आधारित शिबिरे विद्यार्थी आणि पालकांसाठी आयोजित केली जातात. हे कार्य निःस्वार्थ भावनेने हजारो साधक करीत असून, सुमारे शंभर जीवनदानी साधकांनी या कार्यासाठी स्वतःला पूर्णपणे समर्पित केले आहे.

धुळे शहरात आयोजित ज्ञानप्रकाश यात्रेसाठी सुमारे ५० साधक ८ दिवसांचा वेळ देऊन निरपेक्ष वृत्तीने सहभागी होणार आहेत. शाळा, महाविद्यालये, क्लासेस येथे विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांसाठी, तसेच सोसायटी, कार्यालये, मंडळे, शासकीय कार्यालये, बँका, रुग्णालये आणि पोलीस ठाण्यांमध्ये एक तासाचे विनामूल्य कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत. शिरपूर पीपल्स बँकेच्या शेजारी, खोल गल्ली, गल्ली क्रमांक चार येथील भट स्मृती हॉलमध्ये २४ ते २६ नोव्हेंबर दरम्यान सायंकाळी साडेपाच ते सात या वेळेत विशेष कार्यक्रम होणार आहेत. यामध्ये आरोग्य, ताणमुक्ती, कुटुंबसौख्य आणि मुलांचा सर्वांगीण विकास या विषयांवर मार्गदर्शन केले जाणार आहे. विद्यार्थी, पालक, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी उपयुक्त संशोधन व उपाय यांची माहिती या कार्यक्रमांतून दिली जाणार आहे.

व्यक्ती कल्याण आणि राष्ट्र कल्याण या उद्देशाने आयोजित मनशक्तीच्या ज्ञानप्रकाश यात्रेतील कार्यक्रमांचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन मनशक्ती साधक कार्यकर्त्यांनी केले आहे. तसेच २३ ते २७ नोव्हेंबर दरम्यान आपल्या परिसरात किंवा संस्थेत एक तासाचा कार्यक्रम आयोजित करू इच्छिणाऱ्यांनी मनशक्ती साधकांशी संपर्क साधावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

धुळे - शहरासह जिल्ह्यात तापमानाचा पारा घसरल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. अचानक तापमान सहा अंशापर्यंत खाली आल्याने थंडीचा तडाखा जाणवत आहे. सहाजिकच थंडीपासून संरक्षण करणाऱ्या गरम कपड्यांचा आणि त्वचेवर अनुकुल परिणाम साधणाऱ्या क्रीमचा नागरिक शोध घेत आहेत.

NAME CHANGE
MY PREVIOUS NAME WAS
KHUDAIJA BI
MY NEW NAME IS
KHUDAIJA BANO RAEES AHMAD ANSARI
ADD- 4256/1A GALLI NO 3, IN FRONT OF RAJENDRA CHATRALAY DEOPUR, DHULE-424001.

जाहीर नोटीस

तमाम जनतेस बँक, पतपेढी,पतसंस्था,वित्तिय संस्था,सावकार तसेच सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तु. जि. धुळे पो. तु. ता. धुळे पैकी **मौजे वार येथिल ग.नं. ४०८ पैकी प्लॉट नं. ४५ चे एकूण क्षेत्र १८८ चौ. मी. चा बखळ प्लॉट त्यासी चतु:सिमा पुर्वेस : प्लॉट नं. ४६अ, पश्चिमेस : ९ मी. रस्ता, उत्तरेस : १२ मी. रस्ता, दक्षिणेस : गट नं. ४०७,** येणे वर्णनाचा आतील बखळ प्लॉट ही **श्री. भरत सुकलाल चौधरी** रा. ५ अ, कृष्णराज सोसायटी, एस. आर. पी. कॉलनी, देवपूर धुळे यांच्या मालकीचे व ताबेउपभोगातील आहे. सदर वरील प्रमाणे मिळकत ही आमचे अशिलांनी कायम खरेदीने विकत घेण्याचा सौदा केलेला असुन बयाणा सुध्दा दिलेला आहे. लवकरच आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

तरी तमाम लोकांना, सर्व बँक, पतपेढी, पतसंस्था, वित्तिय संस्था, सावकार यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर **बखळ प्लॉट**वर कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क व व्यवहारा बाबत हरकत असल्यास,मिळकतीवर कोणाचाही बोजा, खावटी हक्क, इतर हक्क, हिस्सा, टांच, गहाण, जप्ती, वहिवाटी हक्क किंवा सदर मिळकती संबधी कोणत्याही प्रकाराचा न्यायालयात दावा न्याय प्रविष्ट किंवा प्रलंबित असल्यास तसेच कोणाचाही लाभात बक्षिसपत्र, सौदापावती,विक्री पावती, खरेदीखत करुण दिलेले असल्यास, असे कोणत्याही प्रकाराचे हक्क किंवा हितसंबंध असल्यास त्यांनी लेखी हरकत किंवा तक्रार ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ (सात) दिवसांच्या आत खालील पत्यावर कागदोपत्री पुरावासह प्रत्यक्ष कळवावी. टपाल, फोनवर व वर्तमान पत्रात परस्पर हरकत मान्य होणार नाही.

मुदतीत हरकती अगर तक्रारी न आल्यास सदर **बखळ प्लॉट** निर्वेध व निर्बोज समजून आमचे अशिल सदरहु मिळकती चा व्यवहार करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती अगर तक्रारी आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस ही आमच्या आशिलांच्या सुचनेवरून आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे स्थळ : धुळे दिनांक २१/११/२०२६

ॲड.अनिल सुरेश अग्रवाल
ग. नं. ४, भांडी बाजार, कांती कॉम्पलेक्स शेजारी, धुळे
मो. ७७०९७७२७५७,७५८८८८४१०७

जाहीर नोटीस

तमाम जनतेस बँक, पतपेढी,पतसंस्था,वित्तिय संस्था,सावकार तसेच सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तु. जि. धुळे पो. तु. ता. धुळे पैकी **मौजे वार येथिल ग.नं. ४०८ पैकी प्लॉट नं. ४६ अ चे एकूण क्षेत्र १२० चौ. मी. चा बखळ प्लॉट त्यासी चतु:सिमा पुर्वेस : प्लॉट नं. ४६ ब, पश्चिमेस : प्लॉट नं. ४५, उत्तरेस : १२ मी. रस्ता, दक्षिणेस : गट नं. ४०७,** येणे वर्णनाचा आतील बखळ प्लॉट ही **श्री. भुषण सुरेश चौधरी** रा. ५ अ, कृष्णराज सोसायटी, एस. आर. पी. कॉलनी, देवपूर धुळे यांच्या मालकीचे व ताबेउपभोगातील आहे. सदर वरील प्रमाणे मिळकत ही आमचे अशिलांनी कायम खरेदीने विकत घेण्याचा सौदा केलेला असुन बयाणा सुध्दा दिलेला आहे. लवकरच आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

तरी तमाम लोकांना, सर्व बँक, पतपेढी, पतसंस्था, वित्तिय संस्था, सावकार यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर **बखळ प्लॉट**वर कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क व व्यवहारा बाबत हरकत असल्यास,मिळकतीवर कोणाचाही बोजा, खावटी हक्क, इतर हक्क, हिस्सा, टांच, गहाण, जप्ती, वहिवाटी हक्क किंवा सदर मिळकती संबधी कोणत्याही प्रकाराचा न्यायालयात दावा न्याय प्रविष्ट किंवा प्रलंबित असल्यास तसेच कोणाचाही लाभात बक्षिसपत्र, सौदापावती,विक्री पावती, खरेदीखत करुण दिलेले असल्यास, असे कोणत्याही प्रकाराचे हक्क किंवा हितसंबंध असल्यास त्यांनी लेखी हरकत किंवा तक्रार ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ (सात) दिवसांच्या आत खालील पत्यावर कागदोपत्री पुरावासह प्रत्यक्ष कळवावी. टपाल, फोनवर व वर्तमान पत्रात परस्पर हरकत मान्य होणार नाही.

मुदतीत हरकती अगर तक्रारी न आल्यास सदर **बखळ प्लॉट** निर्वेध व निर्बोज समजून आमचे अशिल सदरहु मिळकती चा व्यवहार करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती अगर तक्रारी आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस ही आमच्या आशिलांच्या सुचनेवरून आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे स्थळ : धुळे दिनांक २१/११/२०२६

ॲड.अनिल सुरेश अग्रवाल
ग. नं. ४, भांडी बाजार, कांती कॉम्पलेक्स शेजारी, धुळे
मो. ७७०९७७२७५७,७५८८८८४१०७

जाहीर नोटीस

तमाम जनतेस बँक, पतपेढी,पतसंस्था,वित्तिय संस्था,सावकार तसेच सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तु. जि. धुळे पो. तु. ता. धुळे पैकी **मौजे वार येथिल ग.नं. ४०८ पैकी प्लॉट नं. ५२ अ चे एकूण क्षेत्र १२० चौ. मी. चा बखळ प्लॉट त्यासी चतु:सिमा पुर्वेस : प्लॉट नं. ५२ ब, पश्चिमेस : प्लॉट तनं. ५१ ब, उत्तरेस : १२ मी. रस्ता, दक्षिणेस : गट नं. ४०७,** येणे वर्णनाचा आतील बखळ प्लॉट ही **श्री. संजय विठ्ठल देव** रा. ३२१३, आग्रारोड, पांचकंदील, धुळे यांच्या मालकीचे व ताबेउपभोगातील आहे. सदर वरील प्रमाणे मिळकत ही आमचे अशिलांनी कायम खरेदीने विकत घेण्याचा सौदा केलेला असुन बयाणा सुध्दा दिलेला आहे. लवकरच आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करणार आहेत.

तरी तमाम लोकांना,सर्व बँक,पतपेढी,पतसंस्था,वित्तिय संस्था,सावकार यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,सदर **बखळ प्लॉट**वर कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क व व्यवहारा बाबत हरकत असल्यास,मिळकतीवर कोणाचाही बोजा, खावटी हक्क, इतर हक्क, हिस्सा, टांच, गहाण, जप्ती, वहिवाटी हक्क किंवा सदर मिळकती संबधी कोणत्याही प्रकाराचा न्यायालयात दावा न्याय प्रविष्ट किंवा प्रलंबित असल्यास तसेच कोणाचाही लाभात बक्षिसपत्र, सौदापावती,विक्री पावती, खरेदीखत करुण दिलेले असल्यास, असे कोणत्याही प्रकाराचे हक्क किंवा हितसंबंध असल्यास त्यांनी लेखी हरकत किंवा तक्रार ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ (सात) दिवसांच्या आत खालील पत्यावर कागदोपत्री पुरावासह प्रत्यक्ष कळवावी.टपाल, फोनवर व वर्तमान पत्रात परस्पर हरकत मान्य होणार नाही.

मुदतीत हरकती अगर तक्रारी न आल्यास सदर **बखळ प्लॉट** निर्वेध व निर्बोज समजून आमचे अशिल सदरहु मिळकती चा व्यवहार करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती अगर तक्रारी आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस ही आमच्या आशिलांच्या सुचनेवरून आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे स्थळ:धुळे दिनांक.२१/११/२०२६

ॲड.अनिल सुरेश अग्रवाल
ग. नं. ४, भांडी बाजार, कांती कॉम्पलेक्स शेजारी, धुळे
मो. ७७०९७७२७५७,७५८८८८४१०७

जाहीर नोटीसीस उत्तर

दैनिक आपला महाराष्ट्र या वृत्तपत्रात दि. १४/११/२०२६ रोजी मौजे पुरमेपाडा ता. जि. धुळे येथील गट क्र. १९८ बाबत **मा. ॲड. प्रमोद एम. चौधरी** रा. धुळे यांच्या मार्फत प्रसिद्धीस दिलेल्या जाहीर नोटीसी संदर्भात त्यांना तसेच सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, मौजे पुरमेपाडा ता. जि. धुळे येथील धुळे महानगरपालिका हद्दीबाहेरील मिळकत गट क्र. १९८ चे क्षेत्र २ हे. ०२ आर अधिका पोटखराब ० हे. ०४ आर असे एकूण क्षेत्र २ हे. ०६ आर पैकी लागवडी लायक क्षेत्र ० हे. ६० आर ज्यास चतु:सिमा पुर्वेस : धुळे ते मुंबई महामार्ग, पश्चिमेस : गट क्र. २००, दक्षिणेस : रामनगर रोड आणि उत्तरेस : याच गटातील उर्वरित क्षेत्र येणे प्रमाणेचे क्षेत्र मिळकत आमचे पक्षकार यांनी **श्री. कचरु मोतीराम कोल्हे, श्री. वाल्मीक मोतीराम कोल्हे, श्री. उत्तम संतोष कोल्हे, सुमनबाई संतोष कोल्हे आणि रेखाबाई वाल्मीक पाटील** सर्व रा. पुरमेपाडा यांच्याकडून दि. १८/०९/२००७ रोजी दस्त क्रमांक ३८९२/२००७ अन्वये नोंदणीकृत खरेदीखताने भरणा देवून कायम स्वरुपी प्रत्यक्ष कबजासह विकत घेतले आहे.

तरी सर्व संबंधितांना तसेच विशेषत: मा. ॲड. प्रमोद एम. चौधरी रा. धुळे यांचे अशिल/पक्षकार यांना कळविण्यात येते की, वर नमूद गट क्र. १९८ पैकी ० हे. ६० आर चे वर नमूद चतु:सिमा प्रमाणेचे क्षेत्र आमच्या पक्षकारांच्या मालकी हक्काचे व प्रत्यक्ष कबजे उपभोगाचे क्षेत्र आहे. त्या क्षेत्रास किंवा आमच्या पक्षकारांच्या मालकी व प्रत्यक्ष कबजेउपभोगास कुठलाही बाधा पोहचेल असा कुठलाही लेखी तोंडी व्यवहार करु नये. तरीही कुणीही तसा काही व्यवहार केल्यास तो आमच्या पक्षकारांवर तसेच आमच्या पक्षकारांनी नोंदणीकृत खरेदीखताने कायम स्वरुपी विकत घेतलेल्या क्षेत्र मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही. कळावे हे जाहीर नोटीसीस उत्तर असे.

धुळे दिनांक २२/११/२०२६

ॲड.मनोज एन.पाटील मो. ७०२०२७०६५७,९८९०२३७१३४
जी. नं. १०२, श्रीराम कॉम्प्लेक्स, साक्री रोड, धुळे

जाहीर नोटीस Exh. 6D

शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो. (सि. डी.) यांचे कोर्टात
दिवाणी कि. अर्ज नं. १०५२/२०२६

१) पातुबाई भाकसिंग पाडवी, २) सुरेश भाकसिंग पाडवी
नं. १ व २ रा. लाकड्या हनुमान
ता. शिरपूर जि. धुळे ..अर्जदार

विरूद्ध

कोणीही नाही, ...जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार पातुबाई भाकसिंग पावडी वगैरे यांनी मे. न्यायालयात नामे भाकसिंग राजाराम पावरा (पाडवी) हे दि. ०५/१०/२०११ रोजी मौजे लाकड्या हनुमान ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर एकमेव वारस असल्याबाबत अर्जदार याने बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणे करीता अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी तमाम लोकांना कळविण्यात येते की, नामे भाकसिंग राजाराम पावरा (पाडवी) यांचे वारसांबाबत वर नमूद अर्जास कोणाची काही हरकत/तक्रार असल्यास दि.०५/१२/२०२६ रोजी ठिक १०/३० वाजता मे.न्यायालयात हजर होवून लेखी तक्रार सादर करावे तसे न केल्यास अर्जदार यांचा अर्ज मंजूर करून अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आदेशावरून

सही... सही...
कनिष्ठ लिपीक (कोर्टाचा शिक्का) **सहा. अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, दिवाणी न्यायालय,
शिरपूर, जि. धुळे शिरपूर जि. धुळे

जाहीर नोटीस

प्रति,

तमाम जनतेस तसेच व बँका, वित्तीय संस्था, खाजगी सावकार, पतसंस्था यांना या जाहीर नोटीसीने सौ. सुनंदा बाळकृष्ण चौधरी रा. शिंदखेडा ता. शिंदखेडा जि. धुळे यांचेकडून जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन मौजे शिंदखेडा ता. शिंदखेडा जि. धुळे येथील गट नं. ११०८ पैकी पश्चिमेकडील क्षेत्र मधला भाग क्षेत्र ०० हे. ४५ आर ही मिळकत श्रीमती जयवंताबाई उर्फ वैजन्ताबाई गणपत पाटील रा. शिंदखेडा ता. शिंदखेडा जि. धुळे ह. मु. दोंडाचा यांचे नावावर असून त्यांनी आमचे पक्षकार सौ. सुनंदा बाळकृष्ण चौधरी यांचेशी विक्रीचा सौदा केलेला आहे.

तसेच लवकर उपरोक्त मिळकतीचे खरेदीखत करावयाचे आहे. या मिळकतीबाबत विक्री संबंधी कोणाची काही हरकत हक्क, अधिकार, गहाण, तसेच बोजा, टांच, वहिवाट या संदर्भीय व इतर अधिकार असल्यास ताबडतोब लेखी स्वरुपात हरकत घेवून कळविण्यात यावे. अन्यथा आमचे पक्षकार वर नमूद मिळकत सदरहू नोटीस प्रसिद्धी झाल्यापासून ७ दिवसात मिळकत दुय्यम निबंधक शिंदखेडा यांचे कार्यालयात नोंदणी करुन खरेदी करतील. मग मात्र कोणाचीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. परस्पर वृत्तपत्रातून हरकत नोंदविल्यास ती विचारात घेतली जाणार नाही. ऐकली जाणार नाही याची नोंद घ्यावी. कळावे.

सदरची नोटीस आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.
दि. २०/११/२०२६

ॲड. वसंतराव आनंदराव पवार मो. ९४२३२३७२५६
गांधी चौक, पाटील वाडा, शिंदखेडा ता. शिंदखेडा जि. धुळे

जाहीर नोटीस

शिरपूर येथील मे.दिवाणी न्यायाधिश सो. वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दिवाणी किरकोळ अर्ज नं.१०५६/२०२६,
निशाणी .नं.

१) पंढरीनाथ भिका गुजर (पाटील) २) दिनेश पंढरीनाथ गुजर (पाटील)
३) घनश्याम पंढरीनाथ गुजर (पाटील) ४) मायाबाई राकेश गुजर (पाटील)
५) मालती धनराज गुजर (पाटीलप)
अ. नं. १ ते ३ रा. अर्थे खुर्द ता. शिरपूर जि. धुळे
अ. नं. ४ रा. नाशिक सिडको , अ. नं. ५ रा. नाशिक आनंदनगर, ... अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही, ...जाबदेणार
कै. भिकुबाई पंढरीनाथ गुजर (पाटील) मृत्यू दि. ३०/९/२०१८
मुळ गाव रा. अर्थे खुर्द, , शिरपूर, जि. धुळे. ....मयत

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

अर्जदार याने म. दिवाणी न्यायाधिश सो. कनिष्ठ स्तर, शिरपूर यांचे कोर्टात दिवाणी कि. अर्ज नं. १०५६/२०२६ चा बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८७२ कलम २ प्रमाणे वारस दाखलासाठी अर्ज केला आहे. अर्जदार नं. १ ची पत्नी कै. भिकुबाई पंढरीनाथ पाटील मृत्यू दि. ३०/९/२०१८ रोजी रा. अर्थे खुर्द ता. शिरपूर जि. धुळे येथे वृद्धापकाळाने मयत झाले आहेत. अर्जदार नं. १ ची पत्नी अर्थे खुर्द ता. शिरपूर जि. धुळे येथील रहिवास असल्याने त्याचा दाखला हा तसेच शासकीय व निमशासकीय योजनांचा लाभासाठी गरजेचा होता. अर्जदार हिचे नावे लावणे कामी वारस दाखल्यासाठी अर्जदार हिने सदरचा अर्ज केला आहे.

याकामी कोणाचेही कोणतीही कायदेशीर तक्रार असल्यास मे. न्यायालयात दिनांक ०१/१२/२०२६ रोजी सकाळी ठिक १०.३० वा. स्वत: किंवा वकीलामार्फत हजर राहून हरकत नोंदवावी. तसे न केल्यास मे. न्यायालयास योग्य तो पुढील आदेश करावा लागेल. याची नोंद घ्यावी. स्थळ : शिरपूर दिनांक २९/१०/२०२६

सही... सही...
कनिष्ठ लिपीक (कोर्टाचा शिक्का) **अधिक्षक**
दिवाणी न्याया. व. स्तर, **दिवाणी न्याया, व. स्तर**
शिरपूर, जि.धुळे **शिरपूर, जि.धुळे**

जाहीर नोटीस

तमाम जनतेस बँका, वित्तिय कंपन्या, पतसंस्था इ. व सर्व संबंधितांना या सदरहू जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन : तु. जि. धुळे, पो. तु. ता. धुळे पैकी मौजे धुळे म. न. पा. हद्दीतील स. नं. ४६३/१/अ पैकी प्लॉट नं. २५, क्षेत्र २२४.०० चौ. मी. यासी विस्तारीत सि. स. नं. ६९८६/२० क्षेत्र २२४.०० चौ. मी. यासी चतु:सिमा.

पुर्वेस : रोड पश्चिमेस : स. नं. ४६२ पार्ट
दक्षिणेस : प्लॉट नं. २६ उत्तरेस : रोड

वर नमूद बखळ प्लॉट मिळकत ही आज रोजी सुशिल दिनेश जैन यांचे मालकी व ताबे उपभोगातील आहे. वर नमूद बखळ प्लॉट मिळकत कायम खरेदी करण्याचे उद्देशाने आमचे अशिलांनी बखळ प्लॉट मिळकत मालकांशी सौदा केलेला आहे व लवकरच खरेदीचा व्यवहार देखील पूर्ण करणार आहेत.

सबब वरील बखळ प्लॉट मिळकतीबाबत इतर कोणाचेही कोणत्याही प्रकारे हक्क, अधिकार, हितसंबंध, हिस्सा, टांच, बोजा, वारसा हक्क, खरेदी, सौदा पावती, कोर्ट कचेरी, बक्षिसपत्र, गहाण, मृत्यूपत्र वगैरे व्यवहार असल्यास त्यांनी सदरहू जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून ८ दिवसांचे आत खालील नमूद पत्त्यावर लेखी हरकत कागदपत्रांच्या सत्यप्रत पुराव्यासह हरकत नोंदवावी. परस्पर वर्तमानपत्रात घेण्यात आलेल्या हरकती ग्राह्य धरण्यात येणार नाही, मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकार हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत निर्वेध व निर्बोज आहे असे समजण्यात येवून आमचे अशील खरयेदीचा व्यवहार पूर्ण करतील. सहाजिकच मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर तसेच मिळकतीवर बंधनकारक राहणार नाहीत. कळावे.

धुळे दिनांक २३/११/२०२६

ॲड.सचिन गोपाळकृष्ण शर्मा मो. ९३२९०५६०००
२५, श्री सर्वेश्वर निवास राजवाडे नगर जवळ, नरेंद्र चौक, चालीसगांव रोड, धुळे

जाहीर नोटीस नि. ७

शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो. ज्युनि. डिव्हीजन यांचे कोर्टात
दिवाणी कि. अर्ज नं. १०९३/२०२६

१) यशोदाबाई बारकू कोळी वगैरे ५ .... अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही .... जाबदेणार
बारकू वामन कोळी : मयत
रा. वाठोडे ता. शिरपूर जि. धुळे मृत्यू दि. २५/०२/२०२६

ज्याअर्थी अर्जदार नं. १ चे पती व अर्जदार नं. २ ते ५ यांचे वडील बारकू वामन कोळी हे दिनांक २५/०२/२०२६ रोजी मौजे वाठोडे ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झाले. त्याअर्थी अर्जदारांना मयताचे वारस लावण्यासाठी तसेच वारसांना शासकीय, निमशासकीय कामासाठी मयताचा वारस दाखला लागणार असल्याने वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदारांनी सदरील अर्ज दाखल केला आहे.

तरी ज्या कोणाची हरकत, तक्रारी असेल त्यांनी आपली हरकत, तक्रार स्वत: अगर वकीलामार्फत हजर होवून दि. १/१/२०२७ पावेतो सकाळी १०.३० वाजता कोर्टात मांडावी, तसे न केल्यास कोणाचीही काहीही हरकत नाही असे समजले जाइल व वरील वारसांच्या नावाने वारस दाखला देण्यात येईल. आज रोजी आमचे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली असे,

दि. ३/११/२०२६

सही.. सही...
कनिष्ठ लिपीक (कोर्टाचा शिक्का) **सहा. अधिक्षक**
शिरपूर कोर्ट शिरपूर कोर्ट

जाहीर नोटीस निशाणी नं.

शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो. ज्युनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात
दिवाणी कि. अर्ज नं. १०५५/२०२६

१) मनोज रामलाल दाभाडे, २) रविंद्र रामलाल दाभाडे,
३) दिपक रामलाल दाभाडे, ४)ज्योती अशोक चव्हाण... अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही .... जाबदेणार

ज्याअर्थी मयत रामलाल हिरामण दाभाडे हे दि. ०५/०४/२०२१ रोजी उपजिल्हा रुग्णालय, शिरपूर जि. धुळे येथे मयत झालेले असून अर्जदार नं. १ ते ४ हेच मयत रामलाल हिरामण दाभाडे यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व संबंधीतांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि. २१/१२/२०२६ रोजी हजर होवून हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करणेत येईल.

दि. २२/१०/२०२६

सही.. सही...
कनिष्ठ लिपीक (कोर्टाचा शिक्का) **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, दिवाणी न्यायालय,
शिरपूर, जि. धुळे शिरपूर जि. धुळे

जाहीर नोटीस

शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो., ज्युनि. डिव्ही यांचे कोर्टात
दि.कि.अर्ज नं.१०१९/२०२६,
नि.नं. चौ.ता.१७/१२/२०२६

१) भारत रामदास पानपाटील, २) कपिल रामदास पानपाटील,
३) राणीबाई रामदास पानपाटील, ४) जगदीश रामदास पानपाटील (मयत)
४-अ) ज्योती जगदिश पानपाटील, ४-ब) नेतल जगदिश पानपाटील
४-क) अश्विनी जगदिश पानपाटील, अर्जदार नं. ४ -अ स्वत:साठी व अर्जदार नं. ४-क हिची अ. पा. क. आई म्हणून
सर्व रा. दहिवद ता. शिरपूर जि. धुळे . .... अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही, ...जाबदेणार
निर्मलाबाई रामदास पानपाटील
मयताचा पत्ता- दहिवद , शिरपूर, जि. धुळे. मृत्यु दि.१७/०९/२६ ....मयत

ज्याअर्थी अर्जदार नं.१ ते ३ यांची आई, अर्जदार नं. ४ -अ यांची सासू व अर्जदार नं. ४-ब ते ४ -क यांची आजी नामे निर्मलाबाई रामदास पानपाटील ह्या दि. १७/०९/२०२६ रोजी मौजे दहिवद ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झालेल्या आहेत. मयतास अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. म्हणून अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अधिनियमाच्या कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज मे. न्यायालयात त्यांनी दाखला केलेला आहे.

त्याअर्थी या नोटीशीने तमाम जनतेला कळविण्यात येते की, तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदार व जाबदेणार व्यतिरिक्त जे कोणी कायदेशीर वारस असतील त्यानी मे. न्यायालयात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत अगर दि.१७/१२/२०२६ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनींधीमार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात अन्यथा सदरील अर्जदाराच्या तोंडी लेखी पुरावा घेवून त्या आधारे अर्जदारा व्यतिरिक्त दुसरे कोणीच वारस नाही, असे गृहीत धरण्यात येवून मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाणपत्र अर्जदार यांनी केलेल्या मागणीप्रमाणे देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मे. दिवाणी न्यायाधीश सो., क.स्तर, शिरपूर, जि.धुळे यांचे आदेशावरून प्रसिध्दीस दिली असे.

सही... सही...
कनिष्ठ लिपीक (कोर्टाचा शिक्का) **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, **दिवाणी न्यायालय,**
शिरपूर, जि.धुळे **शिरपूर, जि.धुळे**

जाहीर नोटीस

तमाम जनतेस सर्व वित्तीय संस्था, बँका पतसंस्था वगैरे यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे बाभळे ता.शिंदखेडा जि.धुळे येथील शेत गट नं.९२ व मौजे कलमाडी ता.शिंदखेडा जि.धुळे शिवारातील शेत गट नं.२४ ह्या मिळकती आमचे अशिल श्री.अरूण अमृत जाधव व त्यांचे वडिल श्री.अमृत अर्जुन जाधव व आमच्या अशिलांचे सावत्र भाऊ बहीणी यांच्या वडिलोपार्जित मिळकती असून आमच्या अशिलांची आई ही श्री अमृत अर्जुन जाधव यांची पहिली पत्नी होत्या. त्या दिनांक ०३/०६/२०२० रोजी मयत झालेल्या आहेत. तसेच आमच्या अशिलांचे वडील व सावत्र बहीण भाऊ असून त्यांच्यात वरील मिळकती संदर्भात मे.शिंदखेडा न्यायालयात रे.मु.नं.४८/२०२४ चा दाखल असून तो दावा न्यायप्रविष्ठ आहे. त्या दरम्यान म.तहसिलदार सो, शिंदखेडा व म.उपविभागीय अधिकारी सो..शिरपूर यांच्याकडे आर.टी.एस.अपील देखील दाखल होते. आमच्या अशिलांचे वडिल श्री.अमृत अर्जुन जाधव व त्यांचे सावत्र भाऊ यांनी वेळोवेळी आपसांत तडतोड घडवून आणण्याच्या बहाण्याने व वरील दोन्ही मिळकती आमच्या अशिलांना आश्वासन देवून आमच्या अशिलांकडून रोख स्वरूपात रक्कम रूपये २,००,०००/- व रक्कम रूपये ४५,०००/- असे वेळोवेळी घेतलेले आहेत. तसेच आता सदर शेत गट नं.९२ या मिळकतीवर आमच्या अशिलांचे वडिल श्री.अमृत अर्जुन जाधव यांचे एकटयाचे नांव ७/१२ उताऱ्यावर आहे. त्या गोष्टीचा गैर फायदा घेवून ते सदरची शेत मिळकत परस्पर त्रयस्थ इसमास विकण्याच्या बेतात आहांत, असे खात्रीलायक आमच्या अशिलांना समजले आहे.

वरील दोन्ही मिळकती ह्या हिंदू अविभक्त कुटुंबाच्या वडिलोपार्जित मिळकती असून त्या मिळकतीत आमच्या अशिलांचा कायदेशीर वारसा हक्काप्रमाणे हिस्सा व अधिकार होता व आहे. तसेच वरील मिळकती संदर्भात मे. दिवाणी न्याय

पान १ वरुन

राजस्थानातील कोट्याजवळ क्रुझर गाडी

कुटुंबीयातील नऊ जणांचा मृत्यू झाला. अपघातात मृत्यू झालेल्या नऊ व्यक्तींचे मृतदेह कोटा येथील न्यू मेडिकल कॉलेजमध्ये ठेवण्यात आले. तर जखमी झालेल्या सहा व्यक्तींना स्थानिक शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. अपघातात ट्रॅव्हलरचा दर्शनी भागासह चक्काचूर झालेला आहे. गाडी पूर्णपणे दाबले गेल्याने घटनास्थळी अक्षरशः रक्ताचा सडा पडलेला होता. मध्यरात्री बाराच्या सुमारास अपघात झाल्याने मदत कार्यातही अडचणी येत होती.

नऊ जण ठार

अपघातात नऊ जणांचा जागीच मृत्यू झाला. सज्जन दौलत पवार (वय ७०, रा. शांतुषा नगर, सुरत बायपास, धुळे), उषाबाई सज्जन पवार (६०), माधवी गणेश पवार (४५), सान्वी गणेश पवार (वय ६, सर्व रा. शांतुषा नगर, सुरत बायपास, धुळे), बाबूलाल दौलत पवार (वय ७३), सुशिलाबाई बाबूलाल पवार (६५, दोघे रा. नवनाथ नगर, सुरत बायपास, धुळे), कैलास भगवान पवार (४५), अनिता कैलास पवार (४०), जान्हवी कैलास पवार (१३, सर्व रा. अमराळे, ता. शिंदखेडा) अशी त्यांची नावे आहेत. मृतांमध्ये धुळे शहरातील शांतुषा नगर येथील चार, नवनाथ नगर येथील दोन आणि शिंदखेडा तालुक्यातील अमराळे येथील तीन जणांचा आहे. मृतांमध्ये दोन मुलींसह, तीन दाम्पत्यांचाही समावेश असून या भीषण अपघातात तीन कुटुंबे पूर्णपणे उध्वस्त झाली.

अमराळे येथेच होणार सर्व मृतांवर अंत्यसंस्कार

अमराळे येथील रहिवासी असल्याने त्यांचे मूळ भाऊबंदकी व नातेवाईक अमराळे येथे वास्तव्यास आहेत. त्यामुळेच धुळ्यातील सहा आणि अन्य तिघे असे सर्व नऊ जणांचे अंत्यसंस्कार अमराळे येथेच करण्यात येणार असल्याचे नातेवाईकांकडून सांगण्यात आले.

अपघातात शरद बाबूलाल पवार (४५), मयुरी शरद पवार (२०), मनीषा शरद पवार (४१, सर्व रा. नवनाथ नगर, सुरत बायपास, धुळे), जगदीश कैलास पवार (१०, रा. अमराळे), गणेश सज्जन पवार (३२), श्रीजीत गणेश पवार (४, दोघे रा. शांतुषा नगर, धुळे) सहा जण जखमी झाले. जखमींमध्ये धुळे शहरातील नवनाथ नगर येथील तीन, शांतुषा नगर येथील दोन, अमराळे येथील एकाचा समावेश आहे. या सर्व जखमींना कोटा येथील स्थानिक शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. सर्व जखमींवर उपचार करण्यात आले असून त्यांना लवकरच धुळे येथे आणण्यात येईल.

कोटा येथील पोलीस नियंत्रण कक्षाकडून माहितीच्या आधारे मृत व जखमी व्यक्तींची माहिती धुळे जिल्हा आपत्ती नियंत्रण कक्षाला देण्यात आली. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. परंतु अपघातात क्रुझरचा चक्काचूर झाला असून त्यातूनच अपघाताची भीषणता दिसून येत होती. ट्रॅव्हलर चालकाला

डुलकी आल्याने ती उभ्या ट्रकला धडकल्याची माहिती मिळाली. एकाच कुटुंबातील चौघे ठार

सज्जन दौलत पवार मूळचे अमराळे येथील रहिवासी आहे. पत्नी उषाबाई पवार, मुलगा गणेश पवार, सून माधवी पवार, नात सान्वी पवार यांच्यासह त्यांचे गेल्या अनेक वर्षापासून चितोड रोड मिल परिसरातील रासकर नगर येथे वास्तव्य होते. दीड ते दोन वर्षांपूर्वीच ते शांतुषा नगर मध्ये राहण्यास गेले. या अपघातात मुलगा गणेश पवार, मुलगा श्रीजीत हा गंभीर जखमी असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. मात्र गणेश पवार याचे आई, वडील, पत्नी आणि मुलगी या चौघांचा मात्र अपघातात मृत्यू झाला.

नगरसेवक कलंत्री यांची भेट

अपघाताची माहिती मिळताच रासकर नगर येथील रहिवाशांमध्ये शोककळा पसरली.

शहरातील वार्ड क्रमांक चे नगरसेवक धीरज कलंत्री, मित्र हरीष पाटील, चेतन कुलकर्णी, गणेश पाटील, मुन्ना इथापे, जगदीश मदाणे, अमोल राजपूत, गोपाळ रासकर, दत्तात्रय (बंटी) पाटील यांनी शांतुषा नगर येथील पवार कुटुंबीयांच्या निवासस्थानी धाव घेतली. यासंदर्भात नगरसेवक कलंत्री यांनी अमराळे येथील पवार कुटुंबीयांशीही चर्चा करीत माहिती जाणून घेतली. परिसरातील अनेक व्यावसायिक, मित्रमंडळी यांनी आपले व्यवसाय बंद ठेवले होते. नगरसेवक कलंत्री यांच्यासह रासकर नगर येथील मित्रमंडळी, नातेवाईक रहिवासी रात्री अमराळे येथे जाण्यास निघाले.

पालकमंत्र्यांनी घेतला आढावा

पालकमंत्री जयकुमार रावल यांनी अपघाताची माहिती घेत आढावा घेतला. सर्व स्थिती जाणून घेतली. जखमींच्या कुटुंबीय नातेवाईकांशीही मोबाईल वरून व्हिडिओ कॉल करीत प्रकृती विषयी विचारपूस केली. तेथील रुग्णालयातील वैद्यकीय यंत्रणा शासकीय यंत्रणा तशीच कोटा दक्षिणचे आमदार संजय शर्मा यांच्याशीही पालकमंत्री रावल यांनी संपर्क साधला. जखमींना मदतीसाठी सूचना दिल्या.

पंतप्रधान कडून शोक व्यक्त

अपघाताची माहिती महाराष्ट्र राजस्थान सह देशभरात पसरली. या घटना बद्दल खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही दुःख व्यक्त केले. अपघातातील मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी दोन लाख रुपये, तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदत शासनाकडून जाहीर करण्यात आले.

अपघातग्रस्तांच्या मदतीला धावले धुळे सिव्हिल सर्जन डॉ. सोनवणे

राजस्थान कोटा अपघातातील धुळ्याच्या अपघातग्रस्तांच्या मदतीला येथील जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. रवींद्र सोनवणे सिव्हिल यांनी धाव घेतली. मुलीच्या शैक्षणिक कामानिमित्त डॉ. सोनवणे कोटा येथेच होते. कोटा येथे झालेल्या भीषण अपघातात धुळे जिल्ह्यातील नऊ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. तर अन्य सहा जण जखमी झाले या अपघाताची माहिती डॉ. सोनवणे यांना मिळाली. त्यांनी तात्काळ येथील मेडिकल कॉलेज रुग्णालयात धाव घेतली. आपल्या कुटुंबाला सोडून त्यांनी जखमी आणि मृतांच्या नातेवाईकांची आस्थेवाईकपणे विचारपूस करत त्यांना धीर दिला. डॉ. सोनवणे यांनी सर्व जखमी व मृतांची नावे नोंदवून घेत तेथील डॉक्टरांशी चर्चा केली. चांगले उपचार करण्याची विनंती केली.

दुष्काळाची स्थिती लक्षात घेता मेढ्यांच्या स्थलांतराला वेग

चारा-पाणी मिळत नसल्याने पशुपालक ट्रॅक्टरमधून मेंढ्यांची वाहतूक करत चारा-पाण्याच्या शोधात भटकत आहेत. जिथे थोडेफार पाणी आणि चारा मिळेल, तिथे मुक्काम करत पुढचा प्रवास सुरू आहे. पशुपालकांची ही धडपड दुष्काळाचे विदारक चित्र मांडणारी आहे. एकीकडे शेतकऱ्यांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागत असताना, दुसरीकडे मुक्या जनावरांच्या चारा-पाण्यासाठीही पशुपालकांना वनवन करावी लागत आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने चारा छावण्या आणि पाण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी पशुपालकांमधून होत आहे.

वाघेश्वर मंदिराच्या टेकडीवर बेकायदेशीर उत्खनन

असा इशाराही विरोधी पक्षनेते हिरालाल चौधरी यांनी दिला आहे. यापूर्वी अशाच पद्धतीने उत्खनन करण्यात येत होते. मात्र रहिवाशांनी तक्रार केल्यानंतर उत्खनन बंद करण्यात आले. प्रशासनाने प्रत्येक पोकलेन धारकाला नोटीस बजावली होती. या उद्या बंदी घालण्यात आल्यानंतर आता पुन्हा एकदा उत्खनन सुरु करण्यात आलेले आहे. विदेशामध्ये टेकडी केव्हा नैसर्गिक सौंदर्याला प्रशासनाचे अभय असते. इथे मात्र बिल्डरांना संरक्षण दिले जात आहे की काय अशी शंका येत आहे. जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी यांनी ताबडतोब उत्खनन बंद करावे अशी मागणी त्यांनी केलीं. टेकडी हे उत्खनन होऊ नये यासाठी विविध वृत्तपत्रांनी मालिका चालवल्या तसेच अखिल भारतीय ग्राहक पंचायतने तक्रार देखील केली होती त्यावर गंभीर दाखल घेण्यात येऊन उत्खनन थांबवण्यात आले होते मात्र पुन्हा एकदा उत्खनन सुरू झाली आहे त्यामुळे तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

पान १ वरुन

रामराव वडकुते यांचे निधन राष्ट्रपती, मोदींकडून शोक

शोकसंदेशात रामराव वडकुते यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केले. जनकल्याणाच्या कार्यासाठी ते समर्पित होते. महाराष्ट्रासह देशाच्या विकासासाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले. त्यांच्या कुटुंबीयांप्रती, चाहत्यांप्रती आणि हितचिंतकांप्रती संवेदना व्यक्त करत असल्याचे राष्ट्रपतींनी म्हटले. उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनीही वडकुते यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला. सार्वजनिक जीवनातील त्यांचे योगदान आणि जनतेच्या सेवेसाठी त्यांनी केलेले कार्य सदैव स्मरणात राहील, असे त्यांनी नमूद केले. राज्यसभेतील सहकारी खासदार गमावल्याची भावना व्यक्त करत त्यांच्या अकाली निधनाने मराठवाड्याच्या सामाजिक आणि राजकीय क्षेत्राची मोठी हानी झाल्याचे पवार यांनी म्हटले. धनगर समाजाच्या विविध प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी आणि समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी वडकुते सातत्याने प्रयतक्शील होते. सामाजिक, राजकीय आणि सहकार क्षेत्रातील त्यांचे कार्य उल्लेखनीय होते. सर्वसामान्यांच्या प्रश्नांची जाण असलेले आणि समाजाच्या हक्कांसाठी आवाज उठवणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख होती, असे पवार यांनी नमूद केले. राष्ट्रवादी ते भाजप राजकीय प्रवास

शर्माच्या घराची तोडफोड, विनयभंगाचा

त्यांच्या समंतीशिवाय घरात प्रवेश केला. जिन्यातील लाईट, सीसीटीव्ही आणि घराचा पुढील लोखंडी दरवाजा तोडला. संबंधित महिलेच्या पतीचे नाव घेत शिवीगाळ केली. घरातील सीसीटीव्ही कॅमेरे, डिव्हीडीआर घेऊन मोबाइल फोडला. लॅपटॉप, दोन प्रिंटर, दूरचित्रवाणी संच तसेच इतर संसार उपयोगी वस्तु, घरातील दारे खिडक्या लोखंडी रॉड लाठ्या-काठयांनी धारदार शस्त्रांनी तोडफोड केली. अंधाधुंद दहशत निर्माण करुन विकी परदेशी याने फिर्यादीस धमकावले. पिडीत महिलेस लज्जा उत्पन्न होईल, असे कृत्य करून तिच्या कुटुंबियांना ठार मारण्याची धमकी दिली. घरात आलेल्या जमावाने गैरवर्तन केले. संशयित नगरसेवक रोहित चांदवडे याने महिलेच्या गळ्यातील तीन तोळयाची सोन्याची चैन तोडली. जमावातील कुणीतरी पर्स मधील पन्नास हजार रुपये काढुन घेतले. साक्षीदार असलेल्या दोन जणांना संशयितांनी हत्याराने आणि लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन ठार मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी वरील सर्व संशयितांविरुद्ध आझादनगर पोलीस ठाण्यात शनिवारी रात्री उशिरा विनयभंगासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल झाला. पोलीस उपअधीक्षक राजकुमार उपासे तपास करीत आहेत.

सोफा, डायनींग टेबल, सोफा- कमबेड, पलंग, दिवान, टिपाई, कपाट, ड्रेसींग टेबल, आराम चेअर, ऑफीस टेबल ऑफीस चेअर तसेच वास्तु-शास्त्रा योग्य शेवन लाकडाचे मंदिर तसेच मार्बलचे मंदिर आणि तुळशी वृंदावन..



शिवम कॉर्पोरेशन
प्रकाश टॉकीज समोर, पारोळा रोड, धुळे
फो. 9595397718, 9665886722

पान १ वरुन

महापौर मायादेवी परदेशींनी झोपेच्या गोळ्या घेतल्या

अपमान केला. त्यानंतर सोशल मिडीयावर शर्मा यांनी सोशल मिडीयावर महापौराच्याबाबत चारित्र्यहनन मजकूर प्रसारित केला. त्याचे पडसाद शनिवारी उमटले. महापौर परदेशी यांच्या मुलाने आणि अन्य दोन-तीन जणांनी संजय शर्मा यांच्या घरी जाऊन संतप्त भावना व्यक्त केल्या. त्यात काहींनी तोडफोड केली. पण, त्याकडे नैसर्गिक प्रतिक्रिया म्हणून पोलिस प्रशासनाने पहायला हवे होते. पोलिसांनी निरनिराळी १६ कलमे वापरून गुन्ह्याची नोंद केली. त्याचवेळी सोशय मिडीयावर झालेल्या चारित्र्यहनणामुळे महापौर विचलीत झाल्या आणि त्यांनी स्वतःच प्रमाणाबाहेर झोपेच्या गोळ्या घेतल्या. त्यांना तातडीने नकाणे रोडवरील विघ्नहर्ता हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. त्या अठ्ठेचाळीस तास तज्ज्ञांच्या देखरेखीखाली आहेत. त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे उपचार करणाऱ्या डॉक्टरांनी सांगितल्याचे आमदार अनुप अग्रवाल यांनी प्रसार माध्यमांना सांगितले.

पोलिस मुख्यालयावर मोर्चा

शहरातील मनोहर चित्रमंदिराजवळील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापासून नारी शक्तीचा अपमान सहन करणार नाही, असे म्हणत निषेध मोर्चा काढण्यात आला. आमदार अनुप अग्रवाल, माजी खासदार सुभाष भामरे, माजी आमदार कुणाल पाटील, बाजार समितीचे संचालक आणि महापौर मायादेवी यांचे पती महादेव परदेशी, भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर यांच्यासह माजी महापौर, आजी-माजी नगरसेवक, पक्षाचे पदाधिकारी आणि श्रीमती परदेशी यांच्या प्रभागातील बहुसंख्य महिला-पुरूष सहभागी झाले होते. अनेकांनी दंडाला काळ्या फिती बांधल्या तर अनेकांनी हातात काळे झेंडे आणि निषेधाचे मजकूर असलेले फलक हाती घेतले होते. नारी शक्तीचा अपमान करणाऱ्या समाजकंटकांवर गंभीर कारवाई करा, अशा घोषणा देत मोर्चा पोलिस मुख्यालयावर पोहचला. आमदार अनुप अग्रवाल यांच्यासह पक्ष पदाधिकाऱ्यांनी पोलिस अधिक्षक सिंगुरी यांना निवेदन दिले. पोलिसांनी सक्त आणि सद्विवेक जोपासत करवाई करायला, हवी अशी मागणी करण्यात आली. शहरासह जिल्ह्यातील अवैध व्यवसाय बंद करताना बेकादा कत्तलखान्यांचा बिमोड करावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

महापौरांकडून गुन्हा दाखल

सार्वजनिक ठिकाणी जातीवाचक शब्द वापरून अपमानित केल्याप्रकरणी संजय शर्मा यांच्याविरुद्ध आझादनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महापौर माया महादेव परदेशी यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर शर्मा स्वतःच पोलिस ठाण्यात हजर झाले. दरम्यान, गुन्हा दाखल झाल्यानंतर त्याच दिवशी रात्री संजय शर्मा यांच्या घरावर आणि दुकानांवर अज्ञात व्यक्तींनी दगडफेक करीत तोडफोड केल्याची घटना घडली. महापौर परदेशी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, संशयित संजय रामेश्वर शर्मा (वय ५८, रा. ऊस गल्ली, आग्रा रोड, धुळे) यांच्या मनात त्या नगरसेविका म्हणून निवडून आल्यानंतर तसेच महापौर झाल्यानंतर भेटायला आणि आशीर्वाद घेण्यासाठी आल्या नाहीत, या कारणावरून राग होता. याच रागातून शर्मा यांनी त्यांच्याविषयी सोशल मीडियावर आक्षेपार्ह आणि बदनामीकारक मजकूर प्रसारीत केल्याचा महापौरांचा आरोप आहे. कारण नसतना पुल कोसळल्यानंतर शर्मा यांनी सोशल मिडीयावर आपल्यावर आर्थिक गैरव्यवहारांचे आरोप केले, असे महापौरांचे म्हणणे आहे. असे असताना १९ नोव्हेंबरला शर्मा यांनी फेसबुकवर ममता बॅनर्जी आणि माया परदेशी यांच्याविषयी आक्षेपार्ह मजकूर असलेली पोस्ट प्रसारीत केल्याचाही आरोप आहे. या प्रकरणी महापौरांच्या फिर्यादीवरून गुरुवारी रात्री पावणेअकराच्या सुमारास आझादनगर पोलीस ठाण्यात अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपअधीक्षक राजकुमार उपासे तपास करीत आहेत. दरम्यान, शनिवारी न्यायालयाने संजय शर्मा यांना दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

संजय शर्मा घर-दुकानांवर दगडफेक

दरम्यान, शहरातील पाच कंदील चौकालगत राहणाऱ्या संजय शर्मा यांच्या घरावर अज्ञात व्यक्तींनी रात्री ८ वाजेच्या सुमारास दगडफेक केल्याची घटना घडली. या घटनेत घराचे नुकसान झाले असून त्यांच्या दोन दुकानांमध्येही तोडफोड करण्यात आली. दुकानांमधील साहित्याची नासधूस करण्यात आली, तर काचेचे शोकेस फोडण्यात आले. दगडफेक व तोडफोड करणारे नेमके कोण होते, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. याप्रकरणी शहर पोलिसांकडून कारवाई सुरू आहे.

अस्तित्व फाऊंडेशन मार्फत मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया



शिरपूर , दि. २२ (प्रतिनिधी) : सौ. द्वेता पटेल-नथवानी यांच्या मार्गदर्शनाखाली अस्तित्व फाऊंडेशन मार्फत रुग्णांची मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आली. समाजातील गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना आरोग्यसेवेचा लाभ मिळावा, तसेच आर्थिक अडचणींमुळे कोणताही रुग्ण उपचारांपासून वंचित राहू नये, या सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून अस्तित्व सोशल वेल्फेअर फाऊंडेशनच्या वतीने सातत्याने आरोग्यविषयक उपक्रम राबविण्यात येत आहेत.

अस्तित्व सोशल वेल्फेअर फाऊंडेशनच्या संचालिका सौ. द्वेता पटेल नथवानी यांच्या मार्गदर्शनाखाली दि. नोव्हेंबर रोजी एकूण गरजू रुग्णांना मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी नाशिक येथील तुलसी आय हॉस्पिटल येथे पाठविण्यात आले असून टप्प्याटप्प्याने शस्त्रक्रिया करण्यात येत आहेत. मोतीबिंदूमुळे दृष्टी कमी होऊन अनेक ज्येष्ठ नागरिकांना दैनंदिन जीवनात विविध अडचणींचा सामना करावा लागतो. आर्थिक परिस्थितीमुळे अनेकांना वेळेवर उपचार घेणे शक्य होत नाही. अशा गरजू रुग्णांना मदतीचा हात देत त्यांना पुन्हा स्पष्ट दृष्टी मिळावी आणि त्यांचे जीवन अधिक सुखकर व्हावे, या उद्देशाने अस्तित्व फाऊंडेशनने हा उपक्रम हाती घेतला. या उपक्रमाचे विशेष म्हणजे केवळ मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रियेपुरतीच मदत मर्यादित न ठेवता, शस्त्रक्रियेनंतर रुग्णांच्या पुढील दृष्टीविषयक गरजांचाही विचार करण्यात आला आहे. शस्त्रक्रिया झाल्यानंतर एक महिन्याने संबंधित सर्व रुग्णांना फाऊंडेशनच्या वतीने मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात येतात. त्यामुळे रुग्णांना शस्त्रक्रियेनंतरच्या उपचार प्रक्रियेतही आवश्यक सहकार्य मिळत आहे.

रुग्णांना नाशिक येथे शस्त्रक्रियेसाठी पाठवतांना अस्तित्व फाऊंडेशनच्या समन्वयिका सौ. सोनिया भसीन, स्वीय सहाय्यक योगेश्वर माळी तसेच अस्तित्व फाऊंडेशनची संपूर्ण टीम उपस्थित होती. सर्वांच्या सहकार्याने आणि नियोजनातून हा आरोग्यसेवेचा उपक्रम राबविण्यात आला. अस्तित्व सोशल वेल्फेअर फाऊंडेशन मार्फत आरोग्यसेवेचे विविध उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहेत.

पाहिजेत
दवाखाना कामासाठी सुंदर हस्ताक्षर असलेले मुले-मुली पार्टटाईम/फुलटाईम लावणे आहे.
भेटण्याची वेळ सकाळी ११ ते १
नवकार होमिओ क्लिनीक
आदर्श पुस्तकालया समोर आग्रारोड, धुळे
9423223658

पाहिजेत
१२ वी पास हुशार व होतकरू मुले लावणे आहेत
निखिल ट्रेडर्स
दु.नं.५, कॉटन मार्केट यार्ड, पारोळा रोड, धुळे.
9604090099
9623962235

पाहिजे
Computer Repairing Shop
मध्ये मुलगा पाहिजे.
-: संपर्क :-
४० गांव रोड, धुळे
9822888878

पाहिजेत
FMCG Distributor
मध्ये इंग्रजी वाचता लिहिता येणारे डिलिव्हरी बॉय, ड्रायव्हर, पाहिजेत.
(वय १८ ते २५)
पत्ता : अग्रसेन चौक जवळ,धुळे
M0.8379882544

शेतजमीन विकत पाहिजे
धुळे तालुक्यात लोकवस्तीपासून ५०० मीटरपेक्षा लांब असलेली, पाण्याची सोय असलेली व रस्त्यालगत शेतजमीन विकत घेणे आहे.
-: संपर्क :-
९४२२०३२६१९

हॉल भाडे कराराने देणे आहे
ग्राऊंडफ्लोअर वरील हॉल 15x100
पहिल्या मजल्यावरील हॉल 15x100
बँक, फायनान्स, एजन्सीज किंवा शोरूम करीता
पत्ता : गल्ली नं. ५, बँक ऑफ इंडिया समोर जय जवान चौकजवळ, धुळे
-: संपर्क :-
9860373909
8668382025

पाहिजे
श्री. छत्रपती हॉस्पिटल धुळे
वेदांत मंगल कार्यालय, देवपूर धुळे.
पूर्ण वेळ अनुभवी फिजीओथेरॅपीस्ट पाहिजे.
आर्कषक पगार
-: संपर्क :-
8788075246
9970520296

विकणे आहे
विकास कॉलनी साक्रीरोड MSEB ऑफिस मागील ३५०० स्केअर फूट ३००० स्केअर फूट बांधकाम ४ प्लॉट बंगला योग्य किंमत आल्यास विकणे आहे.
- संपर्क -
9421890419
9579438167

REQUIRED
A SOCIAL ORGANIZATION REQUIRES BOYS & GIRLS ATTRACTIVE SALARY. POSITIONS 2-2 EACH.
CONTACT:-
8390997836

पाहिजे
होलसेल औषधी दुकानात Comp. Data Entry साठी मुलगी पाहिजे.
गांधी पुतळा, धुळे
-: संपर्क :-
9420635465

पाहिजेत
अन्न धान्य आडत दुकानात (ऑफिस) कामासाठी माणूस लावणे आहे.
समक्ष भेटा.
-: संपर्क :-
9403453061
9673942025

पाहिजे
दुकान कामासाठी व मार्केटींगसाठी माणूस लावणे आहे.
-: संपर्क :-
भाग्यश्री कृषी सेवा केंद्र
पारोळा रोड, धुळे
9420370555

पाहिजेत
धुळे येथे कुठलेही परिसरात फक्त मेन रोडवरच दुकान किंवा घर विकत पाहिजे.
-: संपर्क :-
7744009966

पाहिजेत
१) कॉम्प्युटर ऑपरेटर/अकौंटंट
२) सेल्समन बाहेर गावासाठी
३) मदतनीस मेडिकल होलसेल साठी
-: संपर्क :-
9823716975
9422287821

फ्लॅट विकणे आहे
चंपाबाग साक्री रोड धुळे येथील पहिल्या मजल्यावरील 1 BHK Flat विकणे आहे.
-: संपर्क :-
9421534949
7498317318

पाहिजेत
MIDC येथे फॅक्टरी कामासाठी कामगार, सुपरवायइजर व Accountant पाहिजेत.
-: संपर्क :-
9130397130

पाहिजे
श्री महालक्ष्मी व्हिसेस (सॅमसंग सर्व्हिस) येथे कॉम्प्युटर ऑपरेटर जागा त्वरीत भरणे आहे.
-: संपर्क :-
9822534352
पत्ता : १३७ जयहिंद कॉलनी, देवपूर, धुळे

गाळा विकणे आहे
अशोक इस्टेट (नहार कॉम्प्लेक्स) येथील ग्राऊंड फ्लोअर गाळा नं. 16, 210 Sq.Ft. त्वरीत विकणे आहे.
-: संपर्क :-.
9822534352
राजेश जोशी

गरम पाण्याचा एकच उपाय...
BAJAJ Crompton Racold USHA



गॅस गिझर
आजच खरेदी करा आणि मिळवा पाईप सोबत फिटिंग फ्री *...
* मॉडेल अनुसार
59 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०